शनिवार, 24 सप्टेंबर 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 53
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • SATURDAY 24 SEPTEMBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-53 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-10 • PRICE-5

# ...अखेर साहेबांच्या स्वप्नातील रेल्वे धावली

## खा. डॉ. प्रितम मुंडे गहिवरल्या : मान्यवरांच्या उपस्थितीत नगर-आष्टी रेल्वेसेवेचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**बीड : आज लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या स्वप्नपूर्तीकडे एक मोठे पाऊल नगर-आष्टी रेल्वेसेवेच्या माध्यमातून पडले आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय रेल्वे राज्य मंत्री रावसाहेब दानवे , भाजपच्या राष्ट्रीय सचिव, माजीमंत्री पंकजाताई मुंडे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, खा. सुजय विखे पाटील, आ. सुरेश धस, आ. बाळासाहेब आजबे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत या रेल्वेसेवेचा शुभारंभ सोहळा संपन्न झाला. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी ऑनलाईन पद्धतीने कार्यक्रमात सहभाग घेऊन उपस्थितांशी संवाद साधला. मुंडे साहेबांच्या वचनपूर्तीच्या दिलेल्या वचनाची आज पुर्तता होतेय हे सांगताना खासदार डॉ. प्रितम मुंडे यांना गहिवरून आले.**




2014 सालच्या लोकसभा पोटनिवडणुकीत मी बीड जिल्ह्याच्या जनतेला लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे स्वप्न पूर्ण करण्याचे वचन दिले होते. आज साहेबांची स्वप्नपूर्ती आणि वचनपूर्ती होते आहे. याचा मला मनस्वी आनंद होतो आहे. हे सांगताना खा.डॉ.प्रितम मुंडे यांना अगदी गहिवरून आले. परंतु त्यांनी स्वतःला सावरत पुढे आपल्या भाषणात आपले लोकप्रिय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचेही आज विशेष आभार मानले. 2014 साली बीड येथे त्यांनी रेल्वे प्रकल्प पूर्ण करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांनी कधीही निधीची कमतरता भासू दिली नाही. केंद्र सरकारच्या समप्रमाणत आणि वेळोवेळी त्यांनी निधी उपलब्ध करून दिला. कोरोनाची माहामारी आली नसती तर आज हीच रेल्वे केंव्हाच परळी पर्यंत धावली असती. मध्यंतरीच्या दोन वर्षांमध्ये कोविडमुळे राज्य सरकारचा निधी मिळाला नाही. परिणामी प्रकल्पाच्या कामात अनेक अडचणी आल्या. शेवटी लोकांचे प्राण, त्यांचे आरोग्य महत्वाचे आहे. मी ऐक डॉक्टर असल्याने मला कोविडचा काळ व्यक्त करण्यात आपला वेळ घ्यायचा नाही, असेही त्या म्हणाल्या. पुढे राज्यात आपले सरकार आले आणि 244 कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. येणाऱ्या काळात पूर्वीपेक्षाही रेल्वे प्रकल्पाला गती देण्यात येईल. हा रेल्वे प्रकल्प पूर्ण करून बीड जिल्ह्यात मोठमोठे उद्योगधंदे उभारण्याचा आमचा मानस आहे. आपल्या माणसांना दळणवळणाचे माध्यम उपलब्ध व्हावे, त्यांच्या हातांना काम मिळावे, त्यांची भरभराट व्हावी हा आमचा मानसही आणि प्रयत्नही आहे. कुठल्याही परिस्थितीत पंतप्रधान व मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्री यांच्या माध्यमातून आम्ही तो निश्चित करु. आम्ही दोघी बहिणी व सहकारी आमदार या प्रयत्नांची नक्कीच पूर्तता करणार असल्याचे त्या अगदी आत्मविश्वासाने बोलल्या. सुखद-दुखद वातावरणात पाणावलेल्या असंख्य डोळ्यांत मुंडे साहेबांची कमी भासत होती.ऐका डोळ्यात साहेब तर दुस-या डोळ्यात रेल्वे होती. आज या कार्यक्रमासाठी नेते मंडळींसह कार्यकर्ते आणि उपस्थित जनसमुदायामधे अगदी उत्साही वातावरण होते. प्रत्येकाच्या डोळ्यात अखेर रेल्वे धावल्याचा जेवढा आंनद खळखळून दिसत होता. तेवढीच मुंडे साहेबांची आठवण अनेकांच्या पाणावलेल्या डोळ्यांतून खळखळ वाहताना दिसत होती. तर कित्येकांचे पाणेरी डोळे साहेब आज तुम्ही असता तर...., तुम्ही असायलाच पाहिजे होते.....! हे सांगत होते. तरीही या अशा सुखद-दुखद वातावरणात हा शानदार सोहळा रंगतदार पार पडला.

**नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाचे यश साहेबांना आणि त्यांच्या सोबत संघर्ष केलेल्या प्रत्येकाला समर्पित !**

नगर-बीड-परळी हा रेल्वे प्रकल्प बीड जिल्ह्यासाठी विकासाच्या वाटा निर्माण करणारा ठरणार आहे . परळीहुन जेंव्हा बीड-आष्टी-नगर मार्गे रेल्वे मुंबईला जाईल . तेंव्हा खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्यातील प्रत्येकाचे स्वप्न पूर्ण होईल व जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय साध्य होईल . या रेल्वेमार्गासाठी संघर्ष करणाऱ्या प्रत्येकासाठी आजचा दिवस ऐतिहासिक आहे . रेल्वेचे हे यश लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांना समर्पित आहे . हे यश तुमच्या स्वप्नांना, विश्वासाला समर्पित आहे . हे यश कष्टकरी शेतकऱ्यांना आणि मुलांना शिक्षणाची वाट सुकर करणाऱ्या रेल्वेचे स्वप्न बघणाऱ्या प्रत्येक माऊलीला समर्पित आहे . हे यश रेल्वेसाठी लढा देणाऱ्या आणि प्रामाणिक प्रयत्न करणाऱ्या सर्वांना समर्पित आहे, असेही त्या यावेळी बोलल्या .

# शिवसेनेच्या ठाकरे गटाला शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यास हायकोर्टाची परवानगी

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** उच्च न्यायालयाने शिवसेनेच्या ठाकरे गटाला शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यास परवानगी दिली. शिवसेनेतील बंडखोरीनंतर केवळ महाविकास आघाडी सरकारच कोसळले नाही, तर अगदी शिवसेना कोणाची हाही प्रश्न उपस्थित झाला. यावर सर्वोच्च न्यायालयात घटनापीठासमोर सुनावणी सुरू असतानाच आता मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्नभूमीवर शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवाजी पार्कवर सुरू केलेला ऐतिहासिक दसरा मेळावा कोण घेणार यावरून वाद निर्माण झाला. आता या वादावर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने शिवसेनेच्या ठाकरे गटाला शिवाजी पार्कवर दसरा मेळावा घेण्यास परवानगी दिली. तसेच मुंबई महानगरपालिकेने आपल्या अधिकारांचा गैरवापर केल्याचंही महत्त्वाचे निरिक्षण नोंदवलं.

दुसरीकडे शिंदे गटाचे आमदार सदा सरवणकर यांनी ठाकरे गटाच्या याचिकेविरोधात हस्तक्षेप याचिका दाखल केली होती. यावर सुनावणी करताना उच्च न्यायालयाने ही याचिका फेटाळली. तसेच शिवसेना कुणाची याबाबत नसल्याचं स्पष्ट केले. यावेळी पालिकेचा निर्णय नाकारण्याचा निर्णय वास्तविकतेला धरून नाही, असे निरिक्षण न्यायालयाने नोंदवलं. दादर पोलिसांचं संख्याबळ पाहता कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उपस्थित होत असल्याचंही न्यायालयाने नमूद केलं.

विशेष म्हणजे मेळाव्यादरम्यान काही गोंधळ झाल्यास या मुद्द्यावर भविष्यात परवानगी न देण्याबाबत उच्च न्यायालयाने सूचक इशाराही दिला आहे. तसेच कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू नये यासाठी पोलिसांना मेळाव्याचे चित्रीकरण करण्याचीही मुभा देण्यात आली.

५ ऑक्टोबरला होणाऱ्या दसरा मेळाव्याची सुनावणी करताना न्यायालयाने सर्वात आधी शिवाजी पार्क मैदानासाठी कोणी अर्ज केला असा प्रश्न विचारला. यावर ठाकरे गटाच्या वतीने ज्येष्ठ वकील अस्पी चिनॉय म्हणाले, ठाकरे गटाने २२ आणि २६ ऑगस्टला अर्ज केला होता. शिंदे गटाच्या सदा सरवणकरांनी ३० ऑगस्टला अर्ज केला होता. सरवणकरांनी अर्ज केला केवळ हेच कारण मनपा सांगत आहे. जर त्यांची कायदा सुव्यवस्था खराब असेल तर तो त्यांचा प्रश्न आहे. रेकॉर्ड पाहिले तर आम्हाला शिवाजी पार्कवर सभेसाठी परवानगी मिळायला हवी.

गटबाजीतून पोलिसांनी संबंधित अहवाल दिला आहे. पोलीस परिस्थितीवर बोलत नाही. ते एका आमदाराला नियंत्रणात ठेऊ शकत नाही का? आम्ही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न तयार करत नाहीये," असा युक्तिवाद केला. यावर न्यायालयाने तुमच्याविरोधात इतर काही तक्रारी आहेत का विचारलं. त्यावर चिनॉय यांनी माझ्या माहितीप्रमाणे नाही असं उत्तर दिलं. तसेच एका आमदाराने तक्रार केली म्हणून इतक्या वर्षांची परंपरा रोखली जाऊ शकत नाही, असंही म्हटलं. चिनॉय पुढे म्हणाले, "सदा सरवणकरांच्या याचिकेतील पहिल्या पानावरील आणि शेवटच्या पानावरील माहिती वेगळी आहे. त्यांनी जे म्हटले ते केवळ अडथळा निर्माण करण्यासाठी आहे.

# आरएसएस कार्यालयावर पेट्रोल बॉम्ब फेकला

आधुनिक केसरी न्यूज

**कोईम्बतूर :** राष्ट्रीय तपास यंत्रणा (NIA)कडून देशभरातील पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (PFI) पदाधिकारी, कार्यकर्त्यांवर छापेमारी केली जात आहे. ज्याच्या निषेधार्थ PFI ने परवानगीशिवाय केरळ बंदचे आयोजन केले होते. या केरळ बंदला उच्च न्यायालयाने बेकायदेशीर म्हटले आणि पीएफआयला फटकारले. असे असतानाही केरळभर हिंसाचार, जाळपोळ, तोडफोड आणि बॉम्बस्फोट झाल्याच्या बातम्या येत आहेत. एवढंच नाहीतर कन्नूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यालयावर पेट्रोल बॉम्बही फेकण्यात आला. त्याचवेळी तामिळनाडूमध्ये निदर्शने झाली आणि कोईम्बतूर येथील भाजपा कार्यालयाची तोडफोड करण्यात आली.

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) चे कार्यकर्ते त्यांच्या नेत्यांच्या आवाहनावर राज्यभर निदर्शने आणि हिंसाचारासाठी बाहेर पडले आहेत. एनआयएच्या कारवाईच्या विरोधात ही निदर्शने आयोजित करण्यात आली होती, मात्र त्यात भीषण हिंसाचार झाला होता. गेल्या दोन-तीन दिवसांपासून एनआयएने देशभरातील पीएफआयच्या कार्यालयांवर, ठिकाणांवर छापे टाकले आहेत. ज्याला पीएफआय कार्यकर्त्यांकडून विरोध केला जात आहे. केरळमध्ये पीएफआयचे राज्य सरचिटणीस ए अब्दुल सत्तार यांनी सकाळी ६ ते संध्याकाळी ६ या वेळेत निदर्शने आणि संपाची घोषणा केली होती. केरळमध्ये पीएफआय बंददरम्यान कार्यकर्त्यांनी पोलिसांवरही हल्ला केला आहे. कोल्लम जिल्ह्यातील पल्लिमुक्कू येथे पीएफआय समर्थकांनी दोन पोलिसांवर हल्ला केला.

# दिंडोरी तालुक्यात जिरेनियम शेती फुलणार !!

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**लखमापूर :** दिंडोरी तालुक्यांला द्राक्षे पंढरी म्हणून संपूर्ण जिल्ह्यात ओळखले जाते. परंतु निसर्गाच्या लहरीपणामुळे द्राक्ष शेती धोक्यात आल्याने शेतकरी वर्ग काही नवनवीन शेती प्रयोग करून आपल्याला आर्थिक आधार कसा मिळेल यासाठी प्रयोग करीत आहे.

तालुक्यात या अगोदर ड्रॅगन फूडची शेती प्रयोग यशस्वी होत असतांना आता शेतकरी वर्गाने आपल्या शेतीत सुगंधी असणारी वनस्पती " जिरेनियम " पिकांची लागवड केल्याने आर्थिक आधार चांगला मिळेल अशी आशा निर्माण केली आहे.



तालुक्यातील अक्राळे शिवारातील राहुल दौलत कदम(कोराटे) यांनी आपल्या एक एकरच्या शेतीमध्ये पारंपरिक शेतीला फाटा देत हा यशस्वी शेती प्रयोग केल्याने अनेकांचे लक्ष वेधले आहे.सुगंधी वनस्पती म्हणजे जिरेनियम शेतीचा दिंडोरी तालुक्यातील हा पहिलाच प्रयोग आहे. जिरेनियम वनस्पतींच्या पानांपासून तेल काढून ते विविध कंपन्यांना विकले जाते. तसेच रोपे तयार करून लागवडीसाठी विक्री करण्यात येते.


कदम यांनी ३ फुट बाय दीड फुट आंतरवर रोपांची लागवड केली असून एकरी दहा हजार रोपे लागली आहे.एका रोपांची किंमत साधाहरणपणे सहा रुपयांला आहे. जिरेनियमच्या झुडपांची लागवड केल्यापासून ३ ते ४ महिन्यात साधारणतः अडीच ते तीन फुट उंचीपर्यंत वाढ होऊन पाल्याची पहिली कापणी केली जाते.एका एकरांत एका कापणीपासून ६ ते ७ टनांपर्यंत पाला व त्या पाल्यांपासुन ६ किलो सुगंधी तेल मिळु शकते. लागवड केल्यापासून ४ वर्षापर्यंत उत्पन्न घेता येते.

**उत्पन्न कसे मिळते :** जिरेनियम वनस्पतींच्या पानांपासून ३० ते ४० किलो सुगंधी तेल मिळते . जिरेनियमच्या तेलाला एका किलोला १२ ते १५ हजार रूपये भाव मिळतो .यासाठी विविध कंपन्यासी याबाबत विक्री करार करण्यात येतो .

**जिरेनियम शेतीतून एकरी १० ते १५ किलो सुगंधी तेलाच उत्पादन :** प्रक्रिया करून जिरेनियम या वनस्पतींच्या पानांपासून तेल काढले जाते .जिरेनियमच्या तेलाला प्रति किलो १३हजार रूपयांपर्यत भाव मिळतो .व एकरी १० ते १५ किलो तेलाचे उत्पन्न मिळते .यातून शेतकरी वर्गाला दीड ते दोन लाख रूपयांपर्यत आर्थिक उत्पन्न मिळते .

**तेलाचं काय होते :** जिरेनियम ही एक सुगंधी व औषधी वनस्पती आहे . याची आधिक माहिती ठिकाणी पाहायला मिळते . या वनस्पतीची एकदा लागवड केल्यास किमान ३ ते ४ वर्ष उत्पादन मिळते . एका एकरांमध्ये १० हजार रोप लागतात . हे पिक एका वर्षात ३ ते ४ वेळा कापणीला येते . एकरी सुरूवातीला खर्च ७० ते ८० हजार रुपये येतो . इतर पिकांच्या तुलनेत पाणी कमी लागते . रोगांचा प्रादुर्भाव अत्यंत कमी, फवारणी व खते यांचा खर्च ही अत्यंत कमी आहे . या पिकांपासून ऑईल निर्मिती केली जाते .तसेच कापणीनंतर उरलेला पालापाचोळा यापासून खत निर्मिती ही केली जाते . या वनस्पती ला भारतातुन विविध ठिकाणांहून मागणी असते . हायडेनसिपरफ्यूम व कॉस्मेटिकसाठी याचा वापर केला जातो . फरफ्यूममध्ये जी नॅचरिलिटी लागते ती यामधुच मिळते .त्यामुळे जिरेनियम तेलाचा सुगंधी साबण, अगरबत्ती, अत्तर, इ .साठी उपयोग केला जातो .

**राहुल दौलत कदम**
कोराटे, ता .दिंडोरी जिरेनियम उत्पादक शेतकरी




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# चिपको आंदोलन

आधुनिक केसरी

**एक लढा असाही ( भाग-3 )**

भागीरथी नदीच्या काठी कोटी या गावाजवळ त्यांचे कार्य आजही सुरु आहे. सुंदरलालजींचा गौरव भारत सरकारने पद्म पुरस्कार देऊन केला. ते आज हयात नाहीत पण बहुगुणा कुटुंबियांचेच तेथील निसर्ग आणि माणसांवर प्रेम आहे. त्यांचा वारसा ते पुढे चालवत आहेत.
आपण ज्या चिपको आंदोलनाविषयी बोलतो आहोत ते साधारण १९७० ते १९७४वृक्ष आणि पर्यावरण वाचवण्यासाठी या कालावधीत सुरु झाले. पण त्यापूर्वीचा एक चित्तथरारक आणि रोमांचक इतिहास या आंदोलनाला आहे. तो आपण थोडक्यात जाणून घेऊ या. इ.स. १७३० मध्ये जोधपूरच्या महाराजांना एक भव्य राजवाडा बांधायचा होता. त्याच्या बांधणीसाठी भरपूर लाकूड लागणार होते. शिवाय या राजवाड्याचे बांधकाम चुन्यात होणार होते. ही चुनकळी तयार करण्यासाठी भरपूर जळणही आवश्यक होते. त्यासाठी भरपूर जंगलतोड करावी लागणार होती. जोधपूर जवळ सोळा मैलांवरच बिष्णोई लोकांची वस्ती असलेली खेजडली गाव होते. या गावाजवळच्या जंगलात खेजरी वृक्षाची मुबलक झाडे होती. राजाने ही झाडे तोडण्याचा आदेश दिला. खेजरी वृक्ष म्हणजे बिश्नोईंचा जीव की प्राण ! शिवाय त्यांच्या दृष्टीने हा पवित्र वृक्ष होता. प्राण गेले तरी बेहत्तर पण खेजरीची झाडे तोडू द्यायची नाहीत असा निर्धार त्यांनी केला. राजाचे सैनिक जेव्हा कुऱ्हाडी घेऊन ही झाडे तोडायला आले तेव्हा बिष्णोई लोकांनी वृक्षांना मिठ्या मारल्या. यात स्त्रियाही आघाडीवर होत्या. अमृतादेवी या स्त्रीने गावातील स्त्रियांना एकत्र केले. त्यांच्यात जागृती घडवली आणि या आंदोलनासाठी त्यांना प्रेरित केले. सैनिकांनी सांगूनही लोक झाडांपासून हटले नाहीत. तेथील मुकादमाने सरळ आधी लोकांवर कुऱ्हाडी चालवा म्हणून आदेश दिला. या लढाईत बिष्णोई लोकांनी आपले प्राण दिले. या लढ्यात गावातील अमृतादेवीबरोबरच एकूण ३६३ ग्रामस्थ धारातीर्थी पडले. एवढा भीषण रक्तपात झाल्यानंतर राजाला आपल्या कृत्याचा पश्चाताप झाला. तो स्वतः गावात पोहोचला. त्याने गावकऱ्यांची क्षमा मागितली आणि यापुढे एकही हिरवे झाड तुटणार नाही असे आश्वासन त्यांना दिले. गावातील ३६३ जणांच्या प्राणांचे मोल दिल्यानंतरच ग्रामस्थांना हा विजय मिळाला होता.आपल्या सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या या अमृतादेवी, खेजडली ग्रामस्थ, चामोलीतील चंडिप्रसाद भट आणि त्यांचे सहकारी, पर्यावरण रक्षणासाठी आपले आयुष्य समर्पित करणारे सुंदरलाल बहुगुणा या सगळ्यांचे कर्तृत्व पाहून या मंडळींना शतशः प्रणाम करावेसे वाटतात. या आंदोलनात अनेक स्त्रिया देखील पुढे आल्या आणि त्यांनी कसे नेतृत्व केले याची रोमहर्षक हकीगत पुढील भागात जाणून घेऊ या. (क्रमशः )



## आनंदी पहाट

### विकृतीची स्वीकृती करू नये

आधुनिक केसरी

आपल्या गत आयुष्यात रममाण व्हायला आपल्याला प्रत्येकालाच हवे असते, ते अधिक प्रियही असते. आपल्या प्रत्येकाच्याच साठवणीतल्या अनेक आठवणी असतात. हर्षाच्या-स्पर्शाच्या, घरच्या-दारच्या, प्रीतीच्या-मैत्रीच्या, स्पर्धेच्या-बक्षिसांच्या, शाळेच्या-कॉलेजच्या, बालपणीच्या-तारुण्याच्या; अशा एक नाही तर अनेक आठवणीत आपल्या अंतर्मनाला सुखावण्यासाठी अनेकदा त्या आपण स्मरत असतो. ह्यांत काही आठवणी सुखाच्या-दुःखाच्या, रागाच्या-वादाच्या, विरहाच्या-प्रहाराच्या, प्रयासाच्या-त्रासाच्या, मानाच्या-अपमानाच्या अशा मिश्र स्वरूपाच्याही असतात. कोणत्या आठवणी आपल्या अंतर्मनासमोरून कधी तरळून जातील, हे काही ठरलेले अथवा आपण ठरवलेले नसते. खरेच, ह्या मनाचे नेमके काय रसायन आहे, आपल्याला काही कळत नाही.
आपल्यापैकी प्रत्येकांत काही उणिवा असतातच, उणिवा नसणारी व्यक्ती सापडणे सद्यःस्थितीत विरळाच; त्याचा शोधही न घेतलेलाच बरा. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती, त्यांत काहींमध्ये संकृतीचे तर काहींमध्ये काही विकृतीचे दर्शन आपल्याला घडत असते. अर्थातच कोणत्याही विकृतीची स्वीकृती आपण सहसा करत नाही, पण आपल्या संकृतीला आणि आपापल्या प्रकृतीला साजेशी एखादी कलाकृती ठरेल, अशी कृती करण्याची आपल्याला जाणीव काहीवेळा होत नाही. कालच्या काही उणिवा कुरवाळत बसण्यात आपण धन्यता मानतो, सतत उणिवांचीच, समस्यांचीच, दःखाचीच सर्वत्र आणि सातत्याने चर्चा करत राहतो. आजच्या आपल्या आणि इतरांच्या जाणीवा जपण्याच्या दृष्टीकोनातून आपण खरेच गांभीर्याने विचार करतोच असे नाही. आपल्या बुद्धिवादी जीवाला कालच्या उणिवा दूर करून, आजच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याची आज खरी गरज आहे. ह्यासाठी आपल्या प्रत्येकाचेच विचार, वर्तन आणि व्यवहार हे स्वतः पुरते मर्यादित न ठेवता इतरांच्या उणिवा दूर करून, त्यांच्या जाणीवा जपून त्यांना नेणीवेपर्यंत नेण्याच्या कामी यायला हवेत.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

### चित्तात रमावा | पांडुरंग ||

सदासर्वकाळ | घेऊ नाम वाचे ||
ध्यान विठोबाचे | सोडू नये ||१||

श्वासाच्या वीणेशी | टाळांचे बोलणे ||
वैराग्याचे जीणे | हरिनाम ||२||

साधावा संवाद | एकांती आत्म्याशी ||
आणि संसाराशी | मौन व्हावे ||३||

स्थितप्रज्ञ व्हावी | मनोवृत्ती देवा ||
चित्तात स्मरावा | पांडुरंग ||४||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## "निरूपण"

आधुनिक केसरी

**जगदम्ब नमस्तुभ्यं कोटिचन्द्रप्रभे नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं कोटिसूर्यप्रभे नमः।। १९ ।।**
कोटीचंद्राप्रमाणे, प्रभा असणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो. कोटीसूर्याप्रमाणे प्रभा असणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यममृतवृष्टिहेतवे।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं विषप्रभावनाशिनि।। २० ।।**
अमृतवृष्टीसाठी जगदंबिके, तुला नमस्कार असो. विषाचा प्रभाव विनष्ट करणारे, जगदंबिके, तुला नमस्कार असो.



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

## ||भक्ति म्हणजे ईश्वराविषयी अत्यंत प्रेम||



आधुनिक केसरी

एखाद्या मोठ्या यंत्रामध्ये एक चक्र सुरू झाले की बाकीची सर्व चक्रे आपापल्यापरी हळू किंवा जलद फिरू लागतात. त्याचप्रमाणे आपल्या मनाचे आहे. मनाची एक शक्ती काम करू लागली की तिच्याबरोबर इतर सर्व शक्तीदेखील हालचाल करू लागतात. मनाला आपल्या शक्तीने ताब्यात आणणे फार कठीण आहे. ते थोर माणसालाच जमण्यासारखे आहे. पारा समोर टाकला तर दिसतो, पण काठीने मारला तर तो मारला जात नाही. त्याचप्रमाणे, मन आहे हे समजते, पण ते आवरता येत नाही. म्हणूनच भगवंताला शरण जावे, आरशावर घाण पडली म्हणून साफ करण्याचा प्रसंग आला. अंतःकरणाची घाण पुसण्याचे काम साधनाने होते. मिरच्या, मिरे, मीठ, इत्यादी पदार्थ एकत्र करून जसा सुंदर मसाला तयार करतात, त्याप्रमाणे भगवंताच्या प्राप्तीसाठी तीन गोष्टींचा मसाला पाहिजे. शुद्ध आचरण, शुद्ध अंतःकरण आणि भगवंताचे नामस्मरण, या त्या तीन गोष्टी आहेत. शुद्ध आचरण म्हणजे प्रामाणिकपणा, धार्मिक आचार आणि नीतीचे वर्तन. शुद्ध अंतःकरण म्हणजे अभिमान नसणे, द्वेषमत्सर नसणे, आणि सर्वजण सुखी असावेत अशी भगवंताची प्रार्थना करणे. भगवंताचे नामस्मरण म्हणजे भगवंताचा केव्हाही विसर न पडणे. नवऱ्याला देव आवडत नाही म्हणून बायकोने नामस्मरण सोडण्याचे कारण नाही. तिने नाम घेतले तर पत्नीधर्म सोडला असे होत नाही.
मनात येणारे भलतेसलते विचार हे नामाच्या प्रेमाला आडकाठी करतात. त्यांचा बंदोबस्त करण्याचा उपाय म्हणजे, या विचारांना थाराच देऊ नये म्हणजे झाले. एक मोठा पोलीस अंमलदार चोर पकडण्यात हुशार होता. तो असे करी की, चोर ज्या बाईच्या नादी असेल तिला फितुर करून घ्यायचा, म्हणजे चोर आपोआप नेमका सापडे. त्याचप्रमाणे आपले मन जिथे गुंतते तिथे भगवंताला ठेवला, की मन आपल्या ताब्यात आलेच म्हणून समजा. मनाचे संयमन करायला दोन उपाय आहेतः एक म्हणजे पातंजल योग, आणि दुसरा म्हणजे भगवंताची भक्ती. पातंजल योग म्हणजे युक्ताहारविहार, नियमित राहणे, आणि इंद्रियांचा निरोध करणे, भगवंताची भक्ती म्हणजे ईश्वराविषयी अत्यंत प्रेम. या प्रेमाची साधने कोणती तर भगवंताचे नामस्मरण, त्याचे कथाकीर्तन, साधुसमागम, आणि त्यातल्या त्यात सद्गुरूची कृपा, ही होत. भगवंताच्या स्मरणाशिवाय जी कर्मे होतात ती वाईट कर्मे होत. कोणताही खाण्याचा किंवा पिण्याचा पदार्थ भगवंताचे नाम घेतल्याशिवाय खायचा नाही, असा नेम ठेवला तर नाम आपोआप येते. कोणत्याही परिस्थितीत आपण नामस्मरणापासून ढळूच नये. जो नामात प्रपंच करील, त्याचा अभिमान नष्ट होऊन त्याला सुखसमाधानाचा लाभ झाल्यावाचून राहणार नाही.

# मृत्यू का गरजेचा

आधुनिक केसरी

**मृत्यू येऊच नये असे प्रत्येकाला वाटते. समुद्रमंथनाच्या वेळी अमृत कलश निघाला, तो प्राशन करण्यासाठी, अमर होण्यासाठी देव-दानवांमध्ये चढाओढ लागली होती, तिथे आपल्यासारख्या सर्वसामान्यांची काय कथा !!!मृत्यूचे भय वाटणे स्वाभाविक आहे. परंतु, मृत्यू टाळणे अशक्य आहे. "जन्म-मृत्यू" हा सृष्टीचा नियमच आहे. तो कोणालाही चुकलेला नाही. तो आवश्यकही आहे. अन्यथा माणसेच माणसाच्या जीवावर उठली असती. कशी? ते पहा...**

एका राजाने शहराबाहेर, वृक्षाखाली बसलेल्या साधूला विचारले, "साधूमहाराज, मला अमर करू शकेल, अशी दिव्य वनौषधी किंवा रसायन तुमच्याजवळ आहे का?" साधू म्हणाला, "हे राजा, हा समोरचा व त्यापलीकडील असे दोन पर्वत ओलांडून गेलास, की, तुला एक सरोवर लागेल. त्याचे पाणी तू पी, म्हणजे अमर होशील.ते दोन पर्वत ओलांडून राजा त्या सरोवरापाशी गेला. त्याचे पाणी पिण्यासाठी हाताची ओंजळ करून सरोवरावर तो वाकला. तेवढ्यात कानावर कुणी तरी कण्हत असल्याचा आवाज आला. पाणी पिणे बाजूला ठेवून राजा आवाजाच्या दिशेने गेला. एक जर्जर माणूस एका झाडाखाली आडवा पडून कण्हत असलेला त्याच्या दृष्टीस पडला. राजाने त्याला कण्हण्याचे कारण विचारले. तो म्हणाला, या सरोवराचे पाणी प्यायल्यामुळे मला अमरत्व आले. परंतु वयाची शंभरी ओलांडताच माझ्या मुलाने घराबाहेर हकलून दिले. गेली पन्नास वर्षे मी या ठिकाणी पूर्णतः दुर्लक्षित अवस्थेत तळमळत पडलो आहे. आता माझी मुलं तर मेलीच, पण नातवंडेही मरायला टेकली असतील. हे बघावे लागू नये, म्हणून गेली पाच वर्षे मी अन्नपाण्याचा त्याग केला आहे. तरीही मी मरत नाही. त्या वृद्धाची कहाणी ऐकून राजा मनात म्हणाला, "छे! नुसत्या अमरत्वाला काही अर्थ नाही. म्हातारपणाशिवाय जर अमरत्व मिळालं, तरच त्यात मजा आहे. आपण ल साधूला माहिती विचारू. त्याने साधूकडे पर्याय मागितला. साधू म्हणाला, "ज्या सरोवराकडे तू जाऊन आलास ना, त्याच्यापुढे असलेला डोंगर ओलांडून तू पलीकडे गेलास, तर पिवळ्या जर्द फळांनी भरलेला एक वृक्ष तुला लागेल. त्या वृक्षाचे एक फळ तोडून तू खा. म्हणजे तुला म्हातारपणाशिवाय अमरत्व मिळेल. राजा त्या वृक्षापाशी गेला. त्याने एक पिवळे धमक फळही काढले. आता तो ते फळ खायला सुरुवात करणार, तोच भांडण सुरू झाल्याचा आवाज कानावर पडला. एवढ्या दूर येऊन कोण भांडत असेल, या विचाराने राजा त्या लोकांजवळ गेला. तिथे त्याला चार तरुण आढळले. त्यातल्या एकाला राजाने भांडणाचे कारण विचारले, त्यावर तो म्हणाला, "आता मी अडीचशे वर्षांचा आहे. तरी माझ्या उजव्या बाजूला उभे असलेले तीनशे वर्षांचे माझे बाबा, पूर्वापार मालमत्ता माझ्या स्वाधीन करत नाहीत. मग त्यांच्याशी भांडू नको तर काय करू ? राजाने युवकाइतक्याच तरुण दिसणाऱ्या दुसऱ्या युवकाला विचारले, तर तो म्हणाला, अहो, माझ्या उजव्या बाजूला उभे असलेले हे माझे साडे तीनशे वर्षांचे वडील आहेत. ते मला संपत्ती देत नाहीत, तर मी तरी मुलाला कुठून संपत्ती देऊ सांगा. साडे तीनशे वर्षांच्या तरुणाकडे राजाने प्रश्नार्थक दृष्टीने पाहिले असता, तो म्हणला, "मी तरी संपत्ती कुठून देणार ? ही चूक माझ्या वडिलांची आहे. ते आता ४०० वर्षांचे आहेत. यावर राजा म्हणाला, "पण एवढी संपत्ती असताना तुम्ही डोंगर दऱ्यांमध्ये का वास्तव्य करताय ? यावर पणाजोबा म्हणाले, आमच्या घरात दिवस रात्र मालमत्तेवरून भांडणे होत असल्याने गावकऱ्यांनी आम्हाला गावाबाहेर हाकलून दिले आणि आम्हाला इथे राहावे लागत आहे. तो प्रकार पाहून राजा म्हणाला, म्हातारपणाशिवाय अमरत्व मिळाले, तर तेही नकोच. कारण ते जास्त भयंकर आहे. राजा साधूजवळ परत आला आणि म्हणाला, तुम्ही मला मृत्यूचे महत्त्व पटवून दिलेत. मृत्यू आहे म्हणून जगात प्रेम आहे, अन्यथा माणसेच माणसांच्या जीवावर उठली असती. साधू म्हणाला, "मृत्यू टाळण्यापेक्षा मिळालेला दिवस आणि मिळालेला प्रत्येक क्षण भरभरून जगून घे. त्यातच खरा आनंद आहे.

# उद्धव ठाकरे यांनी अमितभाईविषयी विचार करून बोलावे

## नाही तर आहे ते आमदारही गमावतील : भाजपा प्रदेशाध्यक्ष मा. चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांचा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी इतका धसका का घेतला आहे, समजत नाही. त्यांच्याविषयी उद्धव ठाकरे यांनी विचार करून बोलावे नाही तर उरलेल्या आमदारांपैकी बहुतेकजण सोडून जातील आणि 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' म्हणत केवळ चारच उरतील, अशी टीका भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शुक्रवारी केली.

ते छत्रपती संभाजीनगर येथे पत्रकार परिषदेत बोलत होते. यावेळी सहकारमंत्री अतुल सावे, भाजपा प्रदेश सरचिटणीस संजय केणेकर, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, प्रदेश सचिव प्रवीण घुगे आणि औरंगाबाद ग्रामीण जिल्हाध्यक्ष विजय अवताडे उपस्थित होते.

चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मा. अमित शाह हे देशाचे गृहमंत्री आहेत. ते मुंबईत आले तर त्यामध्ये ठाकरे यांना चुकीचे वाटण्याचे कारण नाही. मा. अमित शाह हे उद्धव ठाकरे यांचा कधी उल्लेखही करत नाहीत. त्यांचे नाव घेऊन टीका करण्याने उद्धव ठाकरे यांनी जे गमावले आहे ते परत येणार नाही. उलट एक दिवस उद्धवजींची अवस्था माझे कुटुंब माझी जबाबदारी अशी होईल की आणि केवळ चारच जण उरतील. उरलेले थोडे आमदार त्यांनी सांभाळावेत नाही तर मुख्यमंत्री शिंदे त्यांना कधी नेतील कळणारही नाही.

त्यांनी सांगितले की, नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत ६०८ पैकी २९४ सरपंच भारतीय



जनता पार्टीचे निवडून आले आहेत. आपल्याकडे त्यांची नाव व पक्षातील पदांसहीत पूर्ण माहिती आहे. त्याखेरीज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे ४१ सरपंच निवडून आले आहेत. अशा प्रकारे ६०८ पैकी ३३५ सरपंच हे भाजपा – शिवसेना युतीचे आहेत. या बाबतीत जे कोणी राजकीय पक्ष दावे करत आहेत त्यांना आपले आव्हान आहे की, त्यांनी सविस्तर यादी द्यावी. त्याचबरोबर आम्हीही देऊ. ते म्हणाले की, भारतीय जनता पार्टी राज्यातील सर्व ९७,५०७ बूथमध्ये पक्ष संघटना बळकट करत असून आम्ही ५१ टक्के मते मिळविण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. आमच्या विरोधात तीनही पक्ष एक झाले तरी आम्ही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेसोबत युती करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात राज्यात लोकसभा निवडणुकीत किमान ४५ आणि विधानसभा निवडणुकीत किमान २०० जागांवर विजय मिळवू. त्यांनी सांगितले की, मराठवाडा आणि विदर्भाच्या वैधानिक विकास मंडळांना महाविकास आघाडी सरकारने मुदतवाढ दिली नाही हे त्या आघाडीचे मोठे षडयंत्र होते. महाविकास आघाडी सरकारने राज्यपाल महोदय बारा आमदार देत नाहीत तोपर्यंत वैधानिक विकास मंडळ देणार नाही, अशी भूमिका घेतली होती. पण शिंदे फडणवीस सरकारने मात्र सत्तेवर आल्यानंतर लगेचच मराठवाड्याच्या विकासासाठी काम सुरू केले आहे. मराठवाडा वॉटरग्रीड आणि समुद्रात जाणारे पश्चिम वाहिनी नद्यांचे पाणी मराठवाड्याकडे वळविणे या कामांवर शिंदे – फडणवीस सरकारने भर दिला आहे, याबद्दल सरकारचे अभिनंदन केले पाहिजे. त्यांनी सांगितले की, भाजपाच्या राष्ट्रीय सचिव मा. पंकजा मुंडे यांच्याशी आपली चर्चा झाली असून त्या नाराज नाहीत. त्या खंबीरपणे पक्षाचे काम करत आहेत. त्यांच्या नाराजीबद्दल कपोलकल्पित बातम्या प्रसिद्ध करून त्यांचे नुकसान करण्याचा प्रयत्न होत आहे.

# आधी प्रकल्पाची जागा दाखवा, मग आंदोलन करा!

## आदित्य ठाकरेंना भाजपचे आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**तळेगाव :** घराण्याच्या वारशातून नेतेपदाची माळ गळ्यात पडलेले आदित्य ठाकरे यांच्या वेदान्ता फॉक्सकॉन प्रकल्पाविषयीच्या आक्रोशाचे पितळ येत्या शनिवारी ते स्वतःच उघडे करणार आहेत. या प्रकल्पाबाबत ठाकरे सरकारने अडीच वर्षांत काहीही प्रयत्न केले नसल्याचा पुरावा आदित्य ठाकरे स्वतःच येत्या शनिवारी तळेगावजवळ आयोजित केलेल्या आंदोलनातून देणार असल्याने त्यांच्या आंदोलनाची महाराष्ट्र वाटच पाहात आहे, अशी खोचक टीका प्रदेश भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी केली. मतदारांचा कौल खुंटीवर टांगून फसवणुकीने मिळविलेली सत्ता आणि प्रकल्पाच्या वाटाघाटींचा वाटा या दोन्ही बाबी हातून गेल्याने ठाकरे पितापुत्रांना नैराश्याने ग्रासले आहे. तळेगावजवळ जेथे हा प्रकल्प येणार असल्याचे त्यांच्याकडून सांगितले जात आहे, त्याबाबत साधा सामंजस्य करारदेखील ठाकरे सरकारने केलाच नसल्याचे स्पष्ट झाले आहे. आता आदित्य ठाकरे या प्रकल्पाच्या नियोजित स्थळी आंदोलन करणार असल्याच्या वावड्या शिवसेनेकडून उठविल्या जात आहेत. त्यामुळे, आधी या प्रकल्पासाठी राखून ठएवलेली जागा दाखवा आणि मगच आंदोलन करा, असे आव्हानही उपाध्ये यांनी दिले. तळेगावातील भूसंपादन फॉक्सकॉनच्या नियोजित प्रकल्पासाठी नव्हे, तर एमआयडीसीच्या नियोजित टप्पा-४ प्रकल्पासाठी करण्यात आले होते. ही जमीन फॉक्सकॉन प्रकल्पासाठी असल्याचे संबंधित जमीन मालकांनाही माहीत नाही, त्यामुळे प्रकल्पाची नियोजित जागा व त्यासंबंधीच्या अधिकृत सरकारी नोंदी अगोदर ठाकरे यांनी दाखवाव्यात, असेही उपाध्ये म्हणाले. ठाकरे पितापुत्रांना महाराष्ट्राची माहिती नाही. वडिलोपार्जित नेतृत्वाच्या वारशातून राज्यावर हक्क सांगणाऱ्या ठाकरे कुटुंबाने आपल्या सत्ताकाळात फॉक्सकॉन प्रकल्पासाठी नेमकी जागा अधिसूचित केली असती, तरी या प्रकल्पासाठी काही केल्याचे श्रेय त्यांना मिळाले असते. पण वाटाघाटींच्या नावाखाली वेगळ्याच हालचालींचा सुगावा लागल्यामुळेच फॉक्सकॉनने महाराष्ट्रातून काढता पाय घेतला असा आरोपही उपाध्ये यांनी केला. फॉक्सकॉनचा प्रकल्प तळेगावजवळ नियोजित होता, असे आदित्य ठाकरे वारंवार सांगत आहेत. त्यामुळे, तळेगावातील कोणती जागा या प्रकल्पासाठी ठाकरे सरकारने देऊ केली होती, त्यासंबंधी विशिष्ट जागेच्या महसुली नोंदी केल्या गेल्या होत्या का, या प्रकल्पासाठी ठाकरे सरकारने किती वेळा अधिकृत बैठका घेतल्या, त्यामध्ये कोणत्या वाटाघाटी झाल्या, ठाकरे सरकारने या प्रकल्पासाठी वेदान्ता-फॉक्सकॉनला कोणत्या सवलती दिल्या, या प्रश्नांची उत्तरे आदित्य ठाकरे यांनी आंदोलनाआधी द्यावीत.

# अजित सिड्सचे व्यवस्थापकीय संचालक समीर मुळे 'सियाम'च्या अध्यक्षपदी

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** सिड इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (सियाम) ची नववी वार्षिक सर्वसाधारण सभा औरंगाबाद येथे दि. २२ सप्टेंबर रोजी श्री. सतिश कागलीवाल यांच्या अध्यक्षतेखाली अत्यन्त खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सभेस सतीश कागलीवाल, अजित मुळे, समीर मुळे, रितेश मिश्रा, समीर अग्रवाल, मुकुंद करवा, प्रभाकर शिंदे, दिलीपराव देशमुख, सचिन भालींगे, नाथा राऊत, किशोर वीर, रामचंद्र नाके, अनिल हिरेमठ वप्रकाश तत्तर यांच्यासहित 42 कंपन्याचे 66 कंपनी प्रतिनिधी हजर होते. सिड इंडस्ट्रीज असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (सियाम) ची वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सन २०२२-२४ या कालावधीसाठी कार्यकारी मंडळासाठी निवडणूक पार पडली. अजित सिड्स प्रा. लि. व्यवस्थापकीय संचालक समीर मुळे यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तर उपाध्यक्षपदी रितेश मिश्रा व दिलीपराव देशमुख, सचिवपदी मुकुंद करवा व कोषाध्यक्षपदी सचिन भालींगे यांची



निवड झाली. निवडणुक कामासाठी स्वतंत्र अशा ॲड. महेंद्र चव्हाण व डॉ. संजय पठारे यांचा समावेश असलेल्या निवडणूक समितीची नियुक्ती करण्यात आली होती. ॲड. महेंद्र चव्हाण यांनी प्रत्येक जागेसाठी एकच अर्ज प्राप्त झाल्याने निवडणूक बिनविरोध झाल्याचे सांगुन निकाल जाहीर केला.

सियाम कार्यकारी संचालक डॉ. शा. द. वानखेडे यांनी सर्व सभासदाचे स्वागत केले. सचिव मुकुंद करवा यांनी वार्षिक अहवालाचे वाचन केले. तसेच खजिनदार सचिन भालींगे यांनी २०२१-२२ चा वार्षिक ताळेबंद तसेच लेखापरीक्षण अहवाल व २०२२-२३ चा वार्षिक अर्थसंकल्प सादर केला. त्यास सर्वसाधारण सभेने एकमताने मान्यता दिली.

सतिश कागलीवाल यांनी अध्यक्षीय समारोपात त्यांच्या दोन वर्षाच्या कालावधीत कार्यकारिणीने केलेल्या सहकार्यबद्दल आभार मानले व मागील वर्षात सियामने केलेल्या विशेष कामाबाबत उहापोह केला, मुख्यतः सियामच्या पहिल्या बियाणे परिषदेचा, राष्ट्रीय स्तरावरील दोन्ही असोसिएशनच्या सियाम सोबतच्या सहकार्याचा व बियाणे उद्योगाची प्रतिष्ठा वाढविण्याच्या गरजेचा उल्लेख केला. पूर्वाध्यक्ष श्री अजित मुळे यांनी सभेस मार्गदर्शन केले. यानिमित्त ग्रो इंडिगो कंपनीचे डॉ. राजेंद्र मराठे यांनी सूक्ष्मजंतूंच्या खऱ्या क्षमतेचा बियाणेसाठी उपयोग या विषयावर व खेतीबाडी कंपनीचे. रविराज जमदाडे यांनी बियाणे कंपन्यासाठी संगणकीय प्रणालीचा वापर या विषयावर सादरीकरण केले.

नूतन कार्यकारिणी खालीलप्रमाणे समीर मुळे-अध्यक्ष, रितेश मिश्रा-उपाध्यक्ष (महिको सिडस प्रा. ली.), दिलीप रामराव देशमुख-उपाध्यक्ष (निर्मल सिडस प्रा. लि.), मुकुंद करवा-सचिव (कृषिधन सीड्स प्रा. लि.), अक्षय भरतीया-सहसचिवबसंत अँग्रीटेक (ई.) लि.), किशोर वीर- सहसचिव (एलोरा नार्च्युल सीड्स प्रा. लि.), सचिन भालींगे- कोषाध्यक्ष (नामदेव उमाजी ॲग्रोटेक प्रा. लि.), नाथा राऊत- सह कोषाध्यक्ष (नोहोगोल्ड सीड्स प्रा. लि.), अजित मुळे- सदस्य (ग्रीन गोल्ड सिडस प्रा. लि.), वैभव काशिकार - सदस्य (अंकुर सिड्स प्रा. लि.), प्रभाकर शिंदे- सदस्य (पंचगंगा सिडस प्रा. लि.), सतिश कागलीवाल-इंमिडीयेट पास्ट प्रेसिडेंट नाथ (बायो- जिन्स (ई.) लि.), समीर अग्रवाल, राघवेंद्र जोशी व अक्षत झुनझुनवाला यांना "निमंत्रीत सदस्य म्हणुन मान्यता देण्यात आली. दिलीप देशमुख, नूतन उपाध्यक्ष यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# लासूर परिसरात आ. प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली पशुधनाचे लसीकरण



आधुनिक केसरी न्यूज

**लासूर :** सेवा पंधरवाडा अंतर्गत लंपी लसीकरण, गोवंश मित्र बळीराजांचा संकल्प वाचवण्याचा हे ब्रीदवाक्य घेऊन आमदार प्रशांत बंब यांच्या मार्गदर्शनाखाली गंगापूर खुलताबाद तालुक्यातील तब्बल चाळीस गावात काल 23 सप्टेंबरला जनावरांना लंपी लसीकरण करण्यात आले असून पुढील तीन दिवसात गंगापूर/खुलताबाद मतदारसंघात सर्व जनावराना लंपी लसीकरण करण्यात येणार आहे. राज्यात मागील काही दिवसांपासून लंपी हा जनावरांना होणारा आजार मोठ्या प्रमाणात पसरला आहे बरीच जनावरे या आजाराने दगावली आहेत लसीकरण करून हा आजारास प्रतिबंध घालता येतो. गंगापूर/खुलताबाद विधानसभा मतदारसंघाचे आ.प्रशांत बंब यांच्या सुचनेनुसार लासूर स्टेशनसह सावंगी व अनंतपुर परिसरातील जनावरांचे लसीकरण करण्यात आले त्या मध्ये लहान मोठे एकूण 540 जनावरांचे लसीकरण करण्यात आले. त्यासाठी माजी उपसरपंच गणेश व्यवहारे यांनी परिसरातील सर्व शेतकरी बांधवांना घरोघरी जाऊन लसीकरण बाबत माहिती दिली आज लसीकरण करण्यासाठी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.सुरेखा माने,डॉ.चामरगोरे, पशुधन पर्यवेक्षक डॉ मदन अंतराये पशुधन सहायक विकास अधिकारी शिल्पा महामुने,पी. एच.सुलाने, डी. के.शेलार, पोपट बडोगे, यांनी सहकार्य केले. यावेळी माजी उपसरपंच गणेश व्यवहारे, ग्रामपंचायत सदस्य अशोक सौदागर, कल्याण पवार, दिनेश व्यवहारे, अर्जुन पवार, यांच्यासह मोठ्या प्रमाणात शेतकरी बांधव उपस्थित होते.

गेल्या तीन वर्ष्याच्या काळातील



कोरोनोतून नागरिक सावरत असताना .पुहा देशासाह राज्यात शेतकऱ्यांच्या गोवंशावर लंपी आजाराने थैमान घातले आहे कोरोनोकाळात आपण सुसज्ज असे गीताबन कोव्हीड हॉस्पिटलच्या माध्यमातून हजारो रुग्णांना आपण कोरोनोमुक्त केले व कित्येक जणांचे प्राण आपण कोव्हीड काळात वाचवले आत्ता पुन्हा बळीराजाच्या गोमाता व गोवंशावर लंपी आजाराने विळखा घातला आहे त्यामुळे बळीराजाच्या मुक्या लक्ष्मीला वाऱ्यावर सोडणार नसून 23 सप्टेंबरळा गंगापूर/खुलताबाद मतदारसंघातील 40 गावात लंपी लसीकरण संपन्न झाले असून आगामी तीन चार दिवसात दोनी तालुक्यातील सर्व गावात लंपी लसीकरण पूर्ण करण्यात येणार आहे . –आ . प्रशांत बंब




# ऑस्करचा प्रवास

आधुनिक केसरी

कलाविश्व आणि चित्रपटसृष्टीतील मानाचा समजला जाणारा पुरस्कार म्हणून ऑस्कर ओळखला जातो. चित्रपटातील दिग्गजांपासून ते अगदी बालकलाकारांपर्यंत सर्वांच्याच मनात या पुरस्कारासाठी एक विशेष स्थान असते. ऑस्करची ती सोनेरी बाहुली आपल्याला मिळावी यासाठी प्रत्येक कलाकार प्रयत्नशील असतो. चित्रपटसृष्टीतील तंत्रज्ञांपासून ते कलाकारांपर्यंत ऑस्कर मिळवण्याकरता चढाओढ लागलेली असते. इतर देशांप्रमाणे भारतातही या पुरस्काराची एक वेगळीच क्रेझ आहे. भारतात निर्मिती होणाऱ्या हजारो चित्रपटांपैकी केवळ काही निवडक चित्रपट ऑस्करसाठी पाठवले जातात. सध्या अनेक सुपरहिट भारतीय चित्रपट हे ऑस्कर निवड प्रक्रियेत सहभागी झाले होते. यात 'द काश्मीर फाईल्स', 'आरआरआर', 'रॉकेट्री: द नम्बी इफेक्ट' अशा अनेक सुपरहिट चित्रपटांच्या नावाचा समावेश होता. मात्र या आणि इतर अनेक सुपरहिट चित्रपटांना मागे टाकत एका गुजराती चित्रपटाने ऑस्करमध्ये भारताचं प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळवली आहे. 'छेल्लो शो' असं या गुजराती चित्रपटाचं नाव आहे. यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. 'छेल्लो शो ' या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन पॅन नलिन यांनी केले आहे. या चित्रपट १४ ऑक्टोबर रोजी हा चित्रपट देशभरात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाने अनेक आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये भारताचं प्रतिनिधीत्व करत प्रशंसा मिळवली आहे. पन नलिन हे आंतरराष्ट्रीय चित्रपटसृष्टीतील एक ताकदीचे नाव आहे. पॅन नलिन यांचे संसारा, व्हॅली ऑफ फ्लॉवर्स आणि अँग्री इंडियन गॉडेसेस हे गाजलेले चित्रपट आहेत. 'छेल्लो शो' याचा अर्थ शेवटचा शो असा होतो. या चित्रपटात एका नऊ वर्षांच्या मुलाची कथा दाखवण्यात आली आहे. जो त्याच्या वडिलांना गुजरातमधील रेल्वे स्टेशनवर चहा विकण्यात मदत करतो आणि टाकाऊ वस्तूंपासून एक प्रोजेक्टर तयार करत थिएटरमध्ये पडलेल्या रील बॉक्सचा वापर करून चित्रपट पाहतो. दरवर्षी ऑस्कर पुरस्कारांसाठी भारतातून एक चित्रपट पाठवला जातो, ज्याला भारतातून पाठवलेली अधिकृत प्रवेशिका असे म्हटले जातात. यात भारतात प्रदर्शित झालेल्या सर्व भाषेतील चित्रपटांचा समावेश असून त्यातील चित्रपटांमधून एका चित्रपटाच्या निवडीचा निर्णय घेतला जातो. या निर्णयाचा भारत सरकारशी काहीही संबंध नसतो. भारतात ऑस्कर पुरस्कारांची तयारी सप्टेंबरपासूनच सुरु होते. फिल्म फेडरेशन ऑफ इंडियातर्फे या कामावर देखरेख ठेवली जाते. ही प्रक्रिया फार किचकट असते. फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया ही देशभरात कार्यरत असलेल्या फिल्म युनियनची मातृसंस्था मानली जाते. दरवर्षी ऑस्करसाठी चित्रपट पाठवण्यासाठी ज्युरी निवड केली जाते. दरवर्षी सप्टेंबर महिन्यापासून ऑस्करला चित्रपट पाठवण्यासाठीची प्रवेश प्रक्रिया सुरु होते. फिल्म फेडरेशन ऑफ इंडिया (FFI) भारतातील सर्व चित्रपट संघटनांना आमंत्रणं पाठवते. त्या आमंत्रणावर अनेक निर्माते त्यांचे त्यांचे चित्रपट यासाठी सादर करतात. यानंतर फिल्म असोसिएशनतर्फे असलेले ज्युरी हे सर्व चित्रपट पाहतात.

# सरसंघचालक-इमाम भेट आणि उंचावलेल्या भुवया !

आधुनिक केसरी



रवींद्र मुळे, नगर
संपर्क क्र : ९४२२२२१५७०

**आज सकाळपासून सामाजिक माध्यमे आणि अन्य सर्व माध्यमात, माध्यम परिसंवादात पूजनीय सरसंघचालक मोहनजी आणि इमाम प्रमुख इलियासी यांची भेट यावर चविष्ट चर्चा सुरू आहे. विशेषत: Pfi या संघटनेवर Nia आणि ED छापे टाकत असताना या चर्चेला अधिक महत्व आले आहे आणि अनेकांच्या भुवया वर गेल्या आहेत. सर्व गोष्टीत राजकारण बघणारे राजकारणी, बातमीच्या शोधात फिरणारे बुभुक्षित काही माध्यम कर्मी आपल्या परीने याचा अन्वयार्थ लावत असताना नेमके हे सगळे समजून घेणे आवश्यक आहे.**

संघाचा संपर्क विभाग हा एक कार्यविभाग आहे जो समाजातल्या मान्यवरांची सूची करतो आणि त्यातील प्रमुखांना भेटण्याचा एक उपक्रम करत असतो. यात काही भेटी व्यक्तिगत होतात तर काही समूहात होत असतात. या भेटीचा हेतू संघाची अधिक माहिती देणे, मान्यवरांच्याकडून संघाबद्दलच्या अपेक्षा समजावून घेणे आणि काही गैरसमज असतील तर ते कमी करणे, दूर करणे हा असतो. हा कार्यक्रम सर्वस्तरावर चालू असतो आणि त्यात सर्व पक्ष, सर्व ज्ञाती, धर्माचार्य, अन्य पंथीय यांच्या प्रमुखांचा समावेश असतो. याची प्रसिद्धी संघ फार करत नाही. स्वतः पूजनीय सरसंघचालक अशा भेटीसाठी वर्षातील महत्वपूर्ण वेळ देत असतात आणि त्याचे नियोजन जवळ जवळ वर्षांपूर्वी ठरते. मध्यंतरी मुंबईत स्वातंत्र्यदिनी ध्वजारोहण करण्यासाठी मुस्लिम समाजाच्या शिक्षण संस्थेत पूजनीय मोहनजी उपस्थित होते.

सर्वेषाम् अविरोधेन ! या भूमिकेतून काम करताना कुठल्याही प्रतिक्रियावादी पद्धत्तीने संघाचे काम उभे राहिले नाही आणि वाढले नाही. संघाच्या कामाचा आधार हा नेहमी सकारात्मक पायावर उभा होता आणि आहे. यासाठी संघाचे बौद्धिक कार्यक्रमाचे विषय आणि गीते हे जाणकार अभ्यासू शकतात ! हिंदू या शब्दाची कल्पना ही संघाने कुठल्याही उपासना पद्धत्तीशी कधीच जोडली नाही! जो या देशाला , भूमीला पितृस्थानी, मातृस्थानी मानतो आणि त्यासाठी समर्पित होण्यासाठी कटिबद्ध होतो तो सारा हिंदूच आहे अशी संघाची धारणा आहे. अर्थात या कल्पनेतील हिंदू हा विश्वातील कुठल्याही भूभागात राहत असला तरी मनाने, अंतरंगाने येथील संस्कृती आणि परंपरेशी जोडलेला राहतो.

संघाने शाखेत कुणाला येण्यास कधीच बंधन घातले नाही पण त्यासाठी काही गोष्टी या अनिवार्य म्हंटल्या म्हणजे १) हे हिंदू राष्ट्र आहे. २) आपले कोण आणि परकीय कोण या बद्दलच्या स्पष्ट धारणा ! म्हणजे मोहमद बिन कासीमपासून सर्व मुस्लिम आक्रमक हे आपले राष्ट्रपुरुष कधीच नव्हते ते आक्रमकच होते आणि त्याचवेळेस पृथ्वीराज, राणा प्रताप, छत्रपती शिवाजी महाराज हेच आमचे राष्ट्रपुरुष आहेत याबद्दल संदेह नसणे. ३ ) रामायण, महाभारत, भगवद्गीता हे धार्मिक नव्हे तर राष्ट्रग्रंथ म्हणून त्याचा गौरव ! ४) राष्ट्रध्वजाचे पूर्ण पावित्र्य आणि अभिमान बाळगून भगव्या ध्वजाचे पारंपरिक, पौराणिक महत्व लक्षात घेऊन त्याचा सार्थ अभिमान ! ५) या परंपरेतून निर्माण झालेल्या योग



सूर्यनमस्कारापासून सर्व जीवनदर्शनावर यथार्थ विश्वास ! संघ हिंदू समाजाचे संघटन करतो त्यामुळे हिंदू विचारात सांगितलेल्या एकम् सत् विप्राः बहुधा वदन्ती ! या तत्वावर संघाचा पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे कोण कुठल्या प्रार्थना स्थळात आपला देव शोधतो आणि भजतो याला महत्व नाही तर सार्वजनिक जीवनात तो देशहिताला प्राधान्य देतो की नाही हे संघाच्या दृष्टीने महत्वाचे आहे.

या देशाला स्वतःच्या अधिष्ठानवर पुढे प्रगती करायची असेल तर सर्व समुदायाला बरोबर घ्यावे लागेल. यासाठी अर्थातच या देशाच्या पुत्ररूपी हिंदू समाजाला पुढे यावे लागेल आणि हिंदू समाजाच्या संघटनेसाठी काम करणारा संघ हा प्रमुख घटक असेल तर त्याचे प्रमुख म्हणून माननीय मोहनजी यांनी पुढाकार घेणे स्वाभाविक आहे. हा अनुनय नसून राष्ट्राच्या हितासाठीची कर्तव्य तत्परता आहे हे येथे लक्षात ठेवण्याची गरज आहे.

अर्थात या सर्व संवाद प्रक्रियेत, आतंकवादी विचाराला धार्मिक अधिष्ठान न देणे, लव्ह जिहादसारख्या विकृत विषयाला नाकारणे, महिला विषयक दृष्टिकोन बदलणे, लोकसंख्येच्या बाबतीत धर्माचा आधार घेऊन सवलत न मिळवणे, धार्मिक परंपराना वैज्ञानिक आधारावर तपासणे, मदरसे हे केवळ धार्मिक नाही तर प्रगत शिक्षण देतील याचा विचार करणे, इतर लोकांच्या श्रद्धांचा तितकाच सन्मान करताना काफिर, जिहाद, मूर्तीभंजक, श्रद्धावान आणि श्रद्धाहीन आशा सर्व कालबाह्य गोष्टींना मुस्लिम समाजाला नाकारावे लागेल ! अशा सर्व मुद्द्यांचा समावेश नक्कीच असणार !

गेल्या काही दिवसात मुस्लिम समाजाची मानसिकता जाणीवपूर्वक बद्दलवण्याचे प्रयत्न काही राष्ट्रविरोधी शक्ती योजनाबद्ध पद्धत्तीने प्रयत्न करत आहेत . PFI सारखी राष्ट्रविरोधी चळवळ यात आघाडीवर आहे. CAA, हिजाब, ज्ञानव्यापी, मथुरा आशा कुठल्याही विषयाचे निमित्त करून अशांतता माजवण्याचे कट कारस्थान शिजत आहे. या सगळ्यात मुस्लिम बुद्धिजीवी, इमाम या मंडळींनी योग्य भूमिका घेणे हे देशाच्या आणि मुस्लिम समाजाच्या हिताचे आहे. कदाचित हे लक्षात आणून देण्यासाठीच माननीय मोहनजी यांच्या या भेटी असू शकतात !

या भेटीनंतर पूजनीय सरसंघचालकाना राष्ट्रपती / राष्ट्रसंत म्हणले गेले ! असे काही म्हणावे म्हणून या भेटी नाहीत ! आत्मस्तुती, आत्मसन्मान आणि आत्ममग्न या वृत्तीपासून संघाचे नेतृत्व नेहमीच लांब राहिले आहे. किंबहुना प्रथम राष्ट्र आणि मग संघटन हेच संघाचे धोरण आहे जे संघनिर्मात्यांनी आखून दिले आहे.

अगदी प्रथम बंदीनंतर वाराणसीला पूजनीय गुरुजी यांचा सत्कार त्यावेळी असलेल्या मुस्लिम नगराध्यक्षाच्या हस्ते झाला तेव्हा पूजनीय गुरुजींनी आपली भूमिका स्पष्ट मांडली होती. पूजनीय बाळासाहेब याना आणीबाणीनंतर जमाते इस्लामची मंडळी भेटीस येत असत. पूजनीय सुदर्शनजी, रज्जूभैया असे संवाद करत असत. काही राष्ट्रीय भूमिका घेणारे मुसलमान राष्ट्रीय मुस्लिम मंच नावाने संघटन चालवतात ! (संघाची ही मुस्लिम आघाडी नाही) त्यांनी निमंत्रण दिले तर संघकार्यकर्ते तेथे मार्गदर्शनास पण जातात.

अर्थात संघाला यात कुठलीही जाहिरात करावी वाटत नाही कारण संघाला संघाला धर्मनिरपेक्ष म्हणून स्वतःला सिद्ध करण्याचा रोग लागलेला नाही. हा रोग लागला की अनुनय सुरू होतो आणि मग त्यात राष्ट्रहिताचा बळी जातो.


अतिरेकी उजवे पणा दाखवत प्रतिक्रिया वादी होण्याची एक स्पर्धा सामाजिक माध्यमात आढळून येत आहे. किंबहुना ती फॅशन पण झाली आहे. लोकप्रिय होण्यासाठी लोकानुरंजन आणि त्यातून उथळ भुमिका ही संघाची कधीच परंपरा नव्हती ! किंवा मूळ गाभा आणि आशय न बदलता संघाने लवचिक भूमिका स्वीकारली आहे.

संघाची भूमिका परिस्थिती निरपेक्ष असते त्यामुळे देशाच्या सर्वांगीण अंतिम हिताला संघाने नेहमीच प्राधान्य दिले आहे. भुवया उंचावून प्रश्न विचारणाऱ्या मंडळींनी, स्वयंसेवकाना संभ्रमित करण्यात वाकबगार असणाऱ्यांनी एकच मंत्र लक्षात ठेवावा संघाचा मंत्र आहे राष्ट्रहित सर्वतोपरी ! या मंत्राला अनुसरून संघाचे सर्वोच्च अधिकारी निर्णय करतात, तसे वागतात आणि स्वयंसेवक त्यांना अनुसरतात ! म्हणून संघ वर्धिष्णू आहे आणि त्यामुळेच राष्ट्रहित पण सुरक्षित आहे !

# मोहम्मद रफी - स्वयं ईश्वर की आवाज

आधुनिक केसरी

**बरेच दिवस जुन्या हिंदी गाण्यांबद्दल काही वाचावे, विस्मृतीत गेलेली गाणी पुन्हा ऐकावी, त्याबद्दल काही लिहावे असे मनात होते आणि तेवढ्यातच ' मोहम्मद रफी - स्वयं ईश्वर की आवाज ' हे राजू कोरती आणि धीरेन्द्र जैन लिखित आणि बहुवचन - नियोगी बूक्स प्रकाशित पुस्तक वाचताच हरखून जावे असे पुस्तक हाती आले. गायक मोहम्मद रफी यांच्याबद्दल लिहिलेल्या हिंदी भाषेतील या पुस्तकाची माहिती वाचकांना करून देण्यासाठी हा पुस्तक परीक्षणपर लेख !**




शहेनशाह-ए-तरन्नुम मोहम्मद रफी, ज्यांना चित्रपट सृष्टीत आणि त्यांच्या चाहत्यांमध्ये रफी साहब म्हणून ओळखले जाते, ते आजवरच्या हिंदी चित्रपटसृष्टीतील सर्वोत्कृष्ट पार्श्वगायकांपैकी एक होते. त्यांच्या आयुष्यातील काही अनमोल क्षण लेखक राजू कोर्टी आणि पत्रकार धीरेंद्र जैन यांनी या पुस्तकात सजवले आहेत. गायन क्षेत्रात येण्यापूर्वीचे त्यांचे सुरुवातीचे जीवन आणि संघर्ष, त्यानंतर मग आकाशवाणीवरून संगीत क्षेत्रात झालेला त्यांचा प्रवेश, पार्श्वगायक म्हणून मिळालेले अफाट यश, या सर्व आठवणी अतिशय ओघावत्या शैलीत या पुस्तकात वर्णन केल्या आहेत. आजही हिंदी चित्रपटसृष्टीत रफीसाहेबांची आठवण किती प्रेमाने जपली आहे हे पुस्तक वाचून तुम्हाला कळेल. तसवीर तेरी दिल में' ,एहसान तेरा होगा मुझपर, एहसान तेरा होगा मुझपर, अच्छा जी मै हारी चली, उडे जब जब जुल्फे तेरी, शिर्डीवाले साईबाबा, ये रेशमी जुल्फे, हा रुसवा सोड सखे,शोधिसी मानवा, राउळीं मंदिरीं , हा छंद जिवाला लावि पिसें अशी असंख्य हिंदी मराठी गाणी आजही रसिकांची दाद मिळवत आहेत.

मोहम्मद रफी यांचा जन्म २४ डिसेंबर १९२४ रोजी अमृतसरजवळील कोटला सुलतान सिंग येथे झाला. मोहम्मद रफी सात वर्षांचे असताना त्यांचे कुटुंब नोकरीनिमित्त लाहोरला गेले. रफी १९४१ च्या सुमारास लाहोरला पोहोचले. तिथे त्याच्या वडिलांनी त्याला एका सलूनमध्ये केस कापण्याचे काम मिळवून दिले. तेथून, मार्च 1943 मध्ये, रफी साहब ऑल इंडिया रेडिओच्या लाहोर स्टेशनच्या स्टुडिओमध्ये ऑडिशन देण्यात यशस्वी झाले आणि त्यांच्या संगीतमय प्रवासाची सुरुवात झाली. मोहम्मद रफी यांच्या आयुष्यातील अशा सर्व घटनांचा, कारकीर्दीचा आढावा या पुस्तकात वाचायला मिळतो.

रफींना जाऊन आज 42 वर्षे झाली. पण आजही त्यांचा चाहतावर्ग तसाच कायम आहे. गेल्या 42 वर्षांत अनेकांनी 'प्रति रफी' बनण्याचा प्रयत्न केला. मात्र, कोणालाही रफी

**पुस्तक परीक्षण**

**प्रज्ञा मनिष पंडित**
संपर्क क्र. 9320441116

साहेबांच्या जवळपासही पोहोचता आलेले नाही. रफींनी अजरामर केलेल्या गीतांची यादी अफाट आहे. त्यातून चांगल्या गीतांची निवड करणे अत्यंत कठीण आहे. तरी देखील त्यांच्या या चरित्रात रफीसाहेबांनी देश-विदेशात सादर केलेल्या तब्बल 7000 गाण्यांचे वर्णन आहे. प्रत्येक गाणे आणि त्यांच्याशी निगडित आठवणी आणि माहिती लेखकांनी क्रमवारपणे अतिशय मनोरंजक पद्धतीने मांडली आहे. तसेच पुस्तकात काही दुर्मिळ छायाचित्रे आहेत जी तुम्हाला..., जर तुम्ही तो काळ पाहिला असेल तर त्या जुन्या दिवसांची आठवण करून देतील, आणि जर तुम्ही माझ्यासारखे असाल म्हणजे त्यानंतरच्या काळात जन्मलेले, ज्यांनी तो काळ फक्त ऐकला आहे, पाहिला नाही..., अशा सर्वांना त्यावेळच्या काळाची झलक दाखवतील.

मला वैयक्तिकरित्या या पुस्तकातील रफी यांची मुलगी नसरीनजी यांची मुलाखत आवडली. रफी यांच्या कार्य कर्तृत्वाविषयी लिहिलेला भागही रंजक वास्तविक तथ्यांनी वाचनीय झाला आहे.

पुस्तकाच्या अनुक्रमणिकेतील 'देव आणि त्याचे पुजारी' या भागात मोहम्मद रफी यांचे जगभरातील चाहते त्यांच्याविषयी काय म्हणतात, त्यांच्या काय आठवणी सांगतात ते तुम्हाला वाचायला मिळेल. मोहम्मद रफी' हे एक वादळ आहे, एक नाद, एक खूळ आहे. एक असे वेड आहे की जे एकदा लागले की, सुटत नाही आणि कोणी सोडवूही शकत नाही. हा लेख वाचल्यावर पुस्तकाबद्दलची तुमची उत्सुकता तर नक्की वाढली असणार याची मला खात्रीच आहे. पण त्याच बरोबर आता तुम्हाला आवडणारी रफी साहेबांची काही गाणी देखील तुम्ही नक्की गुणगुणाल हेही निश्चित! आणि मला अस वाटतं की हीच आपल्या सर्व श्रोत्यांकडून त्यांना ही संगीतमय भावनांजली असेल. जर तुम्ही रफी साहेबांची गाणी ऐकत असाल आणि त्यांचे जीवन अधिक जवळून जाणून घ्यायचे असेल तर त्यांचे हे चरित्र नक्की वाचा.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# सत्यशोधक समाज : महात्मा फुलेंची परिवर्तनवादी क्रांतिज्योत



भीमराव सरवदे
संपर्क क्र : 9405466441

आधुनिक केसरी

**महात्मा फुलेंनी मुंबई, पुणे आणि इतर ठिकाणच्या सुशिक्षत मंडळींना एक विनंतीपत्र पाठवून पुण्यात एक सभा बोलावली. ५० ते ६० लोक ज्योतीरावांच्या आमंत्रणाला मान देत पुण्यात दाखल झाले. हा बैठकीचा दिवस होता २४ सप्टेंबर १८७३ चा. याच दिवशी ज्योतिरावांनी 'सत्यशोधक समाज' नावाची ज्योत पेटवली. आज दीड शतकानंतरही फुल्यांनी लावलेली ही ज्योत अंधारलेल्या दिशांना उजेडाचा दीपस्तंभ बनून विवेकनिष्ठ अनुयायांना मार्गदर्शन करीत आहे. फुलेंनी शूद्र आणि अति-शूद्रांना जातिव्यवस्थेच्या मगरमिठीतून मुक्त करून शोषण व अत्याचारांपासून संरक्षण देण्याचे मुख्य ध्येय समोर ठेवून, मौलिक परिवर्तनाकरिता हिंदू समाजरचनेतील माणसांना उच्चनीच मानणारा जातिभेद, कर्मकांड, मूर्तिपूजा, स्त्रीदास्य, अंधश्रद्धा यांचे निर्मूलन करून वैचारिक क्रांती घडविण्याकरिता महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली.**

महात्मा ज्योतिराव फुले यांनी जाती, वर्ग आणि वर्णावर आधारित विषमतेचे उच्च्याटन करण्यासाठी आक्रमक संघर्ष केला. सामाजिक सुधारणांसाठी नव्या कल्पनांचे ते अग्रदूत होते. महात्मा फुल्यांच्या या चळवळीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज आणि महात्मा गांधी यांच्यासारख्या दिग्गजांनाही प्रेरणा मिळाली, ज्यांनी नंतर जातीभेदाच्या विरोधात दंड थोपटले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तर त्यांना आपले गुरूच मानले होते!

महात्मा ज्योतिराव फुले एकोणिसाव्या शतकात भारतातील उत्कृष्ट विचारवंत, समाजसुधारक, तर्कशास्त्रज्ञ, धर्मशास्त्रज्ञ, विद्वान, संपादक आणि पुरोगामी विचारांचा युगनिर्माता होते. सावित्रीबाई या आपल्या पत्नीला प्रशिक्षण दिल्यानंतर त्यांनी ऑगस्ट १८४८ मध्ये भारतातील स्त्रियांसाठी पहिली शाळा सुरू केली. सावित्रीबाई फुले यांच्याकडे पहिली शिक्षिका म्हणून पहिले जाते.

जातिभेदाच्या सामाजिक अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी ज्योतिबांच्या आयुष्याला १८४८ साली एका घटनेने चालना दिली आणि भारतीय समाजात सामाजिक क्रांती घडवून आणली. ज्योतिरावांना त्यांच्या एका मित्राच्या लग्नाचे निमंत्रण देण्यात आले होते, जे एका उच्चपदस्थ ब्राह्मणाच्या कुटुंबातील होते. मात्र, लग्नात वराच्या नातेवाईकांनी ज्योतिबाची जात कळल्यानंतर त्यांचा अपमान करून शिवीगाळ करून वरातीमधून हाकलून दिले. ज्योतीबांनी हा प्रसंग घरी येऊन आपले पिता गोविंदराव याना सांगितला. गोविंदरावांनी पेशवाईत ब्राह्मणेतरांवर झालेले याहूनही अमानवीय व क्रूर प्रसंग सांगितले. ज्योतीरावांनी त्याच क्षणाला प्रचलित जाति-व्यवस्था आणि सामाजिक रूढी परंपरा संपवण्याचा निर्धार केला. थॉमस पेनच्या द राइट्स ऑफ मॅन या प्रसिद्ध ग्रंथाचा अभ्यास केल्यानंतर ज्योतिरावांनी त्यातून लक्षणीय प्रेरणा घेतली. त्यांचा असा विश्वास होता की स्त्रियांचे प्रबोधन आणि शूद्र व अतिशूद्र जातींचा लोकलढा सामाजिक दुष्प्रवृत्तींशी लढण्यासाठी उभा करणे काळाची गरज आहे.

महात्मा फुले यांच्या या प्रागतिक चळवळीला अनेक कारणे आहेत. त्यांतील अत्यंत महत्त्वाचे म्हणजे पेशवाईच्या उत्तरार्धामधील ब्राह्मणी वर्चस्वाचा काळ. या काळात, ब्राह्मणी राज्यात जातिभेदाची तीव्र अंमलबजावणी, बाह्मणेतर जातींना दडपण्याची राज्यकर्त्यांची प्रवृत्ती, शूद्राति-शूद्रांची जीवघेणी पिळवणूक, कायद्याच्या अंमलबजावणीतील पक्षपात, बेसुमार भ्रष्टाचार व लाचलूचपत अशी बेबंदशाही व सवैराचार चालू होता. साहजिकच त्या काळी महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी सामाजिक जीवनात बाह्मणांचे धार्मिक व प्रशासकीय क्षेत्रांत पूर्ण वर्चस्व होते. परंपरागत हिंदू धर्माच्या चौकटीच्या पकडीत सर्व समाज गुरफटला होता. त्याचा प्रवर्तक व समर्थक वर्ग विशेष करून ब्राह्मण वर्ग होता. ह्या चौकटीविरूद्ध बंड करणारी शक्ती सत्यशोधक समाजाच्या रूपाने जागृत झाली आणि मानसिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या रूपाने धगधगणाऱ्या बंडाचे निशाण रोवले व समाजातील अनिष्ट प्रवृत्तींविरूद्ध, जवळजवळ सर्वच आघाडयावर त्यांनी युद्ध पुकारले.

महात्मा फुले यांनी सत्यज्ञानाचे साधन किंवा प्रमाण कोणते, यासंबंधी समग्र चर्चा केली आहे. ''शुद्ध सत्य हे धर्मगंथात किंवा ऋषी, गुरू, अवतार व ईश्वर, प्रेषित या कुणांमध्येही नाही; ते मनुष्याच्या सदसद्विवेकबुद्धीत वास करते. निसर्गातील सत्य व नैतिक सत्य ही दोन्ही प्राप्त करून देणारी बुद्धी मनुष्यात स्वाभाविकपणे वसत असते. सृष्टिकर्त्यानेच मनुष्यजातीला दिलेली ती नैसर्गिक देणगी आहे. निर्मिकाने मानवाला एकदाच एक ज्ञानाचा दिव्य ठेवा दिला आहे; तो म्हणजे बुद्धी होय.'' महात्मा फुले यांची सत्यशोधक समाजाविषयीची ही तात्त्विक बैठक पूर्णतः बुद्धीवादी आहे. त्यांना धर्मसंस्था मान्य नाही; मात्र 'निर्मिका' चे म्हणजे सृष्टिनिर्मात्याचे अस्तित्व ते मान्य करतात.

कर्ते समाजसुधारक जोतिराव फुले यांना ११ मे १८८८ रोजी त्यांच्या षष्ट्यब्दी पूर्तीच्या निमित्ताने तसेच बहुजनांच्या हक्कांसाठी समर्पित करणारी चाळीस वर्षे समाजोपयोगी सेवा पूर्ण केली होती, या पूर्ततेचे चिरस्मरण राहावे यासाठी जोतिराव फुले यांचा सत्कार करण्याचा निर्णय बहुजन आणि सत्यशोधक नेते व कार्यकर्त्यांनी घेतला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रावबहादूर विठ्ठलराव कृष्णाजी वांदेकर, कामगार चळवळीचे आद्यक्रांतिकारक नारायण मेघाजी लोखंडे अग्रस्थानी होते. जोतिराव फुले यांना महात्मा ही पदवी देण्यासाठीचा पुढाकार रावबहादूर वांदेकर व त्यांच्या सहकारी कर्मचाऱ्यांनी घेतला.

ज्योतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केल्यानंतर सध्याच्या आदर्शांची आणि इतिहासाची पद्धतशीरपणे मांडणी केली. हिंदूंच्या वेदांचा, ऐतिहासिक पवित्र धर्मग्रंथांचा ज्योतिरावांनी तीव्र निषेध केला. त्यांनी अनेक विविध प्राचीन ग्रंथांद्वारे ब्राह्मणधर्माच्या नोंदी शोधून काढल्या आणि समाजातील शूद्र* आणि अतिशूद्रांना* दडपून आपले सामाजिक श्रेष्ठत्व टिकवून ठेवण्याच्या उद्देशाने शोषक आणि अमानुष कायदेशीर मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी ब्राह्मणांना जबाबदार धरले. समाजाला जातिभेदापासून मुक्त करणे आणि ब्राह्मणांद्वारे लादलेल्या कलंकांपासून शोषितांची सुटका करणे हा सत्यशोधक समाजाचा उद्देश होता. जात आणि वर्ग कोणताही असो सत्यशोधक समाजात सर्वांना प्रवेश खुला होता. एवढेच नव्हे तर या चळवळीत ज्यूंच्या सहभागाचेही स्वागत केले होते. १८६८ मध्ये ज्योतिरावांनी आपल्या वाड्यातील एक पाण्याचा हौद सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी खुला करून लोकांतील उच्चनिचतेचा भेदभाव संपवण्याचा प्रयत्न केला.



ज्योतिबांनी त्यांच्या हयातीत अनेक लेख व पुस्तके लिहिली आणि शेतकऱ्याचा आसूड सारखा ग्रंथ हा सामाजिक सुधारणांच्या विचारसरणीवर आधारित असून नवी मानवतावादी ध्येये यात ठासून भरलेली दिसून येतात. ब्राह्मणांचे कसब, इशारा या काही पुस्तकात त्यांनी बहुजन समाजास भटशाहीच्या बंधनातून सोडवावे या हेतूने आपली मते मांडली आहेत. त्यांनी सत्सार या अनियतकालिकाचे दोन अंक छापले असून पंडिता रमाबाईंच्या ख्रिस्ती धर्म स्वीकारल्यामुळे अनेक प्रस्थापित वृत्तपत्रांनी त्यांच्याविरुद्ध ऊरबडवेपणा केल्याने महात्मा फुल्यांनी सत्सार अंक काढून रमाबाईंची बाजू घेऊन प्रस्थापित समाजव्यवस्थेस चपराक दिल्याने त्यांचे कौतुक केले.

गुलामगिरी आणि शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथात महात्मा फुले यांनी बहुजन समाजात चेतना निर्मितीचे स्पष्टीकरण देण्यासाठी ब्राह्मणी व वसाहतवादी ज्ञानप्रकारांवर टीका केली. जाणीवपूर्वक चेतनेचे आणि आचरणाचे परिवर्तन हे सत्यशोधक समाजाबरोबरच्या त्यांच्या सामाजिक कार्याची अधिक स्पष्ट व्यस्तता बनली. आपल्या सदस्यांनी आणि समर्थकांनी सत्यशोधाच्या मेहनीतीसाठी आपले लक्ष्य केंद्रित करावे, अशी मागणी करत हा समाज फुले यांच्या संदेशाचे एक दालन बनला. फुले यांच्या कार्याचा हा पैलूच त्यांच्या बौद्धिक हेतूच्या पराकाष्ठेचे प्रतिनिधित्व करेल असे वाटते. फुलेंनी आपल्या समवयस्कांना स्वतःसाठी सत्याचा शोध घेऊन जगायला सांगितले असले, तरी केवळ सत्यशोधच नव्हे तर सत्यशोध धर्माचे आचरण करावे, असे आवाहन केले असून सत्याला जर आचरणाचे स्वरूप प्राप्त व्हायचे असेल, तर सत्याला निश्चित स्वरूप देणेही त्यांना आवश्यक वाटले.

इतिहासवादी मनःस्थितीत फुले म्हणतात, जे धार्मिक ग्रंथ लिहिले गेले आहेत, त्यांपैकी असे एकही पुस्तक नाही जे सुरुवातीपासून शेवटपर्यंत वैश्विक सत्याशी (सर्वजनिक सत्य) मिळतेजुळते आहे. कारण त्या प्रत्येक गोष्टीला एका पक्षपाती व्यक्तीने एका प्रसंगानुसार लिहिले आहे, त्यामुळे त्याच्या पंथाचा सर्व मानवजातीला समान फायदा होत नाही.* हिंदू धर्मग्रंथांच्या निर्मितीविषयीच्या त्यांच्या स्वतःच्या युक्तिवादाची आठवण करून देत फुले वाचकांना पूर्वग्रहदूषित धर्मपूस्तक न वाचण्याचा सल्ला देतात. बायबल आणि कुराण यांची मात्र काही अंशी ते स्तुती करतात कारण त्यांचे भाषांतर अनेक स्थानिक भाषांमध्ये करण्यात आलेले होते आणि त्यामुळे लोकांना ते सहजपणे समजून घेता येऊ शकत होते. वेदांचे तसे नव्हते त्याची गुप्तता पाळण्यात येत होती. बायबल आणि कुराण हे सर्वमान्य लोकांसाठी खुले होते. वेदांच्या वेगळेपणाबद्दल बोलताना फुले म्हणतात, जर निर्माणकर्त्याने सर्व मानवजातीच्या हितासाठी वेद तयार केले असते, तर त्यांनी ते जगातील सर्व भाषांमध्ये लिहिले असते आणि ते केवळ ब्राह्माणांच्या प्रत्यक्ष वापरासाठी आणि भोगासाठी संस्कृतमध्ये उपलब्ध झाले नसते. वेदांच्या या अवस्थेमुळे विश्वव्यापी ईश्वराच्या सत्याच्या संदर्भात व ब्राह्माणांच्या वेदांमध्ये सत्य काय आणि असत्य काय हे ठरवताच येत नाही.

ग्रंथ हे मानवी वस्तू असल्यामुळे त्यांचे महत्त्व केवळ मानवी शंका आणि अनुभवातूनच प्रकट होते. पूर्वीच्या ग्रंथांप्रमाणे जेथे फुले शूद्र-अतिशूद्र आणि ब्रह्म यांच्यामध्ये द्विगुणात्मक विरोध निर्माण करण्यासाठी नामकरण, वर्णन आणि वर्गीकरणाचा वापर करतात, येथे ते स्त्री-पुरुषांचा एकत्र किंवा मानवजातीचा उल्लेख करून समानतेच्या कठोर तर्कशास्त्राची अंमलबजावणी करतात.

शूद्र आणि अति शूद्रांना मुक्त करणे आणि ब्राह्माणांसारख्या उच्च समजलेल्या जातीकडून त्यांचा होणारा गैरवापर रोखणे हे सत्यशोधक संघटनेचे मूलभूत लक्ष्य होते. या सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून जोतिराव वेदांकडे पवित्र म्हणून पाहत नसत. त्यांनी वेदाच्या कौतुकाची खिल्ली उडवली होती आणि चातुर्वर्ण्य चौकट मोडून काढण्यासाठी अहोरात्र कष्ट उपसले. निरुपयोगी चालीरीतींचा आणि देव आणि व्यक्तीमधील मध्यस्थांचा त्यांनी कडाडून विरोध केला होता.

सत्यशोधक समाजाने विवेकनिष्ठ व वस्तुनिष्ठ युक्तिवादाचा प्रसार करण्याचे प्रतिपादन केले आणि ब्राह्मणांचे प्रस्थापित वर्चस्व नाकारले. संधी, निष्पक्षता, सहवास, मानवी आदर, आर्थिक समता आणि मूल्य यांवर अवलंबून असलेली दुसरी सामाजिक चौकट बनवायची गरज आहे, हे महात्मा फुले यांनी ठामपणे मान्य केले, तर जुनी, विसंगत आणि शोषक सामाजिक चौकट आणि ती ज्या गुणांवर आधारलेली आहे, त्या गुणांचे निर्मूलन केले पाहिजे. हे आपल्या पुस्तकातून त्यांनी ठणकावून सांगितले होते. महिला, शूद्र आणि अतिशूद्रांच्या मेंदूवर अधिराज्य करणाऱ्या फसव्या आख्यायिकांचे त्यांनी आपल्या ग्रंथातून वाभाडे काढल्याचे दिसून येते. जोतिबाने परखड लेखन आणि तर्कशास्त्राच्या कसोटीवर रूढी परंपरांचा पर्दाफाश केला. ते इथल्या व्यस्थेला असा प्रश्न विचारतात की, संपूर्ण मानवजातीच्या कल्याणासाठी

# वनस्पती तुपाचा शोध

आधुनिक केसरी

**वनस्पती तुपाचा शोध कोणी लावला? आहे या प्रश्नाचं उत्तर? चला गुगल करा. मिळालं? मिळणारच नाही. कारण तसा संदर्भ उपलब्धच नाही. कोण असेल हा माणूस? कोणत्या पाश्चिमात्य देशातला असेल? कधी लागला हा शोध? वनस्पती तुपाचा शोध पहिल्यांदा लावला त्या मराठी माणसाचे नाव आहे – नारायण बाळाजी भागवत! कोण होते हे, त्यांची विशेष ओळख काय याबद्दल नंतर बघूयात. मुळात भागवत घराणे हे पंढरपूरचे एक श्रीमंत घराणे. पण आपले वडील आपल्या आईशी वाईट वागतात म्हणून नारायणरावांचे वडील बाळाजी निराधार अवस्थेत मुंबईस आले. कष्ट करून शिक्षण घेतले.**

दहावीच्या परीक्षेत मिळालेल्या 'जगन्नाथ शंकरशेठ' शिष्यवृत्तीच्या आधाराने त्यांनी शिक्षण पूर्ण केले. पुढे वकील आणि नंतर उच्च न्यायालयाचे न्यायाधीश झाले. त्यांची पत्नी ही त्या काळातली म्हणजे एकोणिसाव्या शतकातली मॅट्रिक होती आणि इंग्रजी पुस्तके वाचणे हा तिचा छंद होता. नंतर बाळाजी भागवत इंदोर संस्थानचे एक प्रधानजी होते.

अशा माता-पित्यांच्या पोटी नारायणरावांचा जन्म १८८६ मध्ये झाला. सगळी भावंडे उच्चशिक्षित होती. नारायणराव मॅट्रिकला असताना वडिलांसारखी 'जगन्नाथ शंकरशेठ' मिळावी या हेतूने ते संस्कृत भाषेचा अभ्यास फार जोमाने करत होते. पण त्यांच्याच एका आप्ताने त्यांना सांगितले, 'नारायणा, तुझी आथक स्थिती उत्तम आहे, तुझे शिक्षण तुझे आई-वडील सहज करू शकतात. त्यामुळे उगीचच जगन्नाथ शंकरशेठ मिळवून तू दुस-या एका हुशार पण गरजू विद्यार्थ्यांचे शिक्षण पैशाअभावी अडवू नकोस आणि जो काही अभ्यास करशील तो आनंदासाठी कर, काही मिळवायचे असे ध्येय ठरवून करू नकोस' हा सल्ला नारायणरावांना जन्मभर मार्गदर्शक आणि दिशादर्शक ठरला.

पुढे नारायणराव मुंबईच्या झेवियर्स महाविद्यालयातून रसायन शास्त्रात एम.ए. झाले. नंतर बंगलोरच्या 'इन्स्टिटयूट ऑफ सायन्स'च्या पहिल्याच तुकडीत रसायनशास्त्रात त्यांनी ऑईल्स आणि फॅट्स यावर संशोधन केले.

पुढे आपल्या वडिलांचे स्नेही इब्राहिमभाई लालजी यांच्या एडनच्या साबणाच्या कारखान्यात त्यांना मदत करण्यासाठी गेले आणि तिथे त्यांच्याच घरात त्यांच्या मुलासारखे राहिले. पुढे १९१९मध्ये पत्नीचे निधन झाल्यावर ते भारतात परत आले. भारतात आल्यावर टाटा ऑईल मिल्स येथे कंपनीचे डायरेक्टर कपिलराम वकील यांचे मुख्य मदतनीस म्हणून ते नौकरी करू लागले.

त्यावेळी अमेरिका व जपान येथे गोडेतेलापासून तूप तयार करण्याचे प्रयत्न सुरूहोते, पण त्यांना यश मिळत नव्हते. पण नारायणराव आणि कपिलराम यांनी त्याच्यात यश मिळवले. पहिले तूप भारतात तयार झाले.

ही गोष्ट टाटा कंपनीचे वित्तीय सल्लागार असलेल्या पीटरसन या अधिका-याला कळली. त्याने या कृतीची मागणी त्यांच्याकडे केली. पण भागवत आणि कपिलराम उत्तरले, ''या क्षेत्रात आम्ही शोधकर्ते ठरलो आहोत तर मग त्याचा फायदा आमच्या देशालाच झाला पाहिजे. आमच्या देशालाच त्याचे श्रेय मिळायला हवे''.

झाले ''ही नेटिव्ह माणसे असला माज करू तरी कसे शकतात?'' असे पीटरसनच्या मनात आले. त्याने टाटांच्या या कंपनीची आथक नाकेबंदी केली. टाटांना ही कंपनी बंद करावी लागली. कपिलराम आणि नारायणराव दोघेही बेकार झाले. अमेरिकेतील एक अतिशय चांगल्या पगाराची नोकरी नारायणरावांनी नाकारली, कारण 'वनस्पती तुपाच्या' शोधाचे श्रेय त्यांना भारतालाच द्यायचे होते.

नारायणराव त्या काळात सात वर्षे बेकार होते. आपले आई-वडील, भावंडे, आपली चार मुले यांचा सगळ्यांचा भार त्यांच्यावर होता. त्यावेळी त्यांची एक बहीण सीता हीने शिक्षिकेची नोकरी करून कुटुंबीयांचे पालनपोषण केले. त्यासाठी त्या जन्मभर अविवाहित राहिल्या.

सात वर्षांनी कपिलराम यांनीच सुरू केलेल्या गुजरातमधल्या सॉल्ट कंपनीत त्यांनी परत नोकरी सुरू केली आणि तिथेही रसायनशास्त्रातले महत्त्वाचे शोध लावले. पुढे तीच कंपनी टाटांनी विकत घेतली आणि तिचे नाव झाले 'टाटा केमिकल्स'. सर्व घडी नीट बसलेली असतानाच नारायणरावांच्या वडिलांना पक्षाघाताचा झटका आला आणि त्यांनी गुजराथ सोडले आणि मुंबईत येऊन त्यांनी साबण आणि बाकीच्या कंपन्यांना लागणारी केमिकल्स बनवणारी 'अनार अँड कंपनी' सुरू केली. आपले मित्र अनंतराव पटवर्धन यांच्याबरोबर!

रसायनशास्त्राचे तज्ज्ञ असणारे नारायणराव हे टेनिस खेळातही अतिशय उत्तम होते. अगदी ६८व्या वर्षापर्यंत ते टेनिस खेळले आणि मोठी मोठी बक्षिसे त्यांनी जिंकली. 'दगडावर टाकले तुम्हाला तरी तुम्ही त्याच्यावरही रुजला पाहिजेत', असा स्वाभिमानाचा सल्ला आपल्या मुलींना देणा-या नारायणरावांच्या मुली आहेत – ''मराठी सारस्वताची सरस्वती'' म्हणून ओळखल्या जाणा-या 'दुर्गा भागवत' आणि महिला शास्त्रज्ञ 'कमला सोहोनी'! खरे तर ज्या शोधाबाबत पूर्ण जगाने शोधकर्त्याचे आभारी राहायला हवे, असा हा शोध! पण आपण नारायणरावांना किती सहज विसरून गेलो आहोत!! आपल्याला ते माहीतच नाहीत.

**(संदर्भ : विज्ञान विशारद लेखिका – वसुमती धुरू – ग्रंथाली प्रकाशन)**



# आईचे डोळे



आधुनिक केसरी

गुणवत्ता यादीत चमकलेल्या रामकृष्णाचं अभिनंदन करण्यासाठी मी फुलांचा गुच्छ घेऊन त्याचं घर शोधत गेलो. घर शोधता शोधता प्रश्न पडला- 'अशा झोपडपट्टीत राहतो रामकृष्ण ? पण राहतो किती नीटनेटका.' त्याच्या व्यक्तीमत्वातील टापटिपीवरून त्याच्या घराचा बांधलेला अंदाज साफ कोसळला होता.
गटारांची अनेक जाळी धडपडत ओलांडत एका फळकुटाच्या झोपडीजवळ गेलो. 'इथंच तो राहतो', म्हणून कुणीतरी सांगितलं.
काळोखातून प्रकाश बाहेर यावा तसा सलील माझ्या आवाजानंच बाहेर आला. "सर ?" आत गेलो. "अभिनंदन !" गुच्छ देत म्हटलं.
मला जायला तसा तीन-चार दिवस उशीरच झाला होता. अभिनंदनाची पहिली वर्दळ थांबून आता रूटिन सुरू झालं होतं.
गुणवत्ता यादीत आलेल्या मुलाचं हे असं घर ? रामकृष्णने अभ्यास कुठे केला असेल ? बाजूच्या रेल्वे आणि लाऊडस्पीकरच्या सततच्या गदारोळात त्याने अभ्यास कसा केला असेल ? त्याचं पुनःपुन्हा अभिनंदन करताना मनातल्या मनात ते काळोखे कोपरे पाहत मी स्वतःलाच विचारीत होतो.
"सर, खूप खूप बरं वाटलं, खरं तर तुम्ही घरी आला आहात, हे खरंच वाटत नाहीये ! सावरलेलो नाहीये मी. सर, मी तुमच्यासाठी चहा करतो," म्हणत तो स्टोव्हला पंप मारु लागला.
"रामकृष्ण, राहू दे. आपण बाहेर घेऊ,"
"तुम्ही काळजी करु नका, मी उत्तम चहा करतो. कोळसेवाडीत कॅन्टीन चालवतो.. फक्त चहाचं." चहाच्या वाफांनी वातावरण भारलं होतं.
"घरात दुसरं कुणी ?"
"ताई आहे. टायपिंगच्या क्लासला गेलीय. वडील किराणा दुकानात हमाल आहेत."
"आई... ?" "आई नाही." रेंगाळलेली स्तब्धता कशी प्रवाही करावी या विचारानं मी गोंधळलो. चहा त्यानं खरंच उत्कृष्ट केला होता. अगदी जीव ओतून !
"रामकृष्ण, तू मार्गदर्शन व्याख्यानमालेत येत होतास. भेटत होतास. उत्तरपत्रिका पुनःपुन्हा तपासून घेत होतास. पण तेव्हा तुझ्याकडे पाहून....?"
"सर, माणसाची परिस्थिती दिसलीच पाहिजे का ? आपले कष्ट, आपलं जगणं बघून कुणीतरी 'अरेरे' करून म्हणणं... यानं काय साध्य होतं ? आतासुद्धा मला खूप बक्षिसं मिळालीत. पण ती कायम पुरणार आहेत का ? पुढचं शिकायला कष्ट करावेच लागणार. टीव्हीवाले आले, निघून गेले. एका मोठ्या क्लबचे अध्यक्ष आणि आमदार, खासदार गाडी आत येत नाही म्हणून उतरून आतही आले नाहीत. सर, परिस्थिती माणसाला आहे त्यापेक्षा मोठं करते."
रामकृष्णाची चमक गुणवत्ता यादीपुरती उरली नव्हती. ती वाक्या- वाक्यातून, डोळ्यातून चमकत होती. "कुठून शिकलास हे सगळं ?"
"सभोवतीच्या मुलांकडून,"
"म्हणजे ?"
"ती नुसताच टाइमपास करतात. बहुतेक नापास होतात. मग रात्री जुगार ! चोरी, लुबाडी हा त्यांचा उत्पन्नाचा मार्ग. पितात, भांडतात ! तेव्हा ठरवलं- आपण तसं व्हायचं नाही. हे मी सातवीत असतानाच ठरवलं. मी सातवीत होतो तेव्हाच माझी आई गेली. इथल्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये. साध्या न्यूमोनियानं."
"बदलेल सारं...."
"बदलतंच आहे, सर. गरिबीचा विचार करायला वेळच कुठे आहे ?" तसे आपले डोळे क्वचितच भरून येतात. काळजाशी दडलेले अश्रू क्वचितच पापणीच्या काठावर येतात.
माझ्या आणि अनेक कॉलेजांच्या भोवती चकाट्या पिटत वेळेचा कचरा करणारी असंख्य मुलं आठवली. रानगेंड्याप्रमाणे फटफट्या घेऊन उधळणारी, देणग्या, फी देऊन प्रवेश घेणारी, तरीही वर्गात बसणं 'पाप' मानणारी असंख्य मुलं ! त्यांच्याच वयाचा हा रामकृष्ण!
असेही अनेक चेहरे डोळ्यांपुढून झरकन् तरळून गेले.
"रामकृष्ण, एकदा माझ्या वर्गात ये... मुलांशी गप्पा मारायला."
"सर, एवढं मोठं करू नका मला. असे काबाडकष्ट करून शिकणारे माझ्यासारखे अनेक आहेत. मनातला वॉचमन जागा असला की कुणी सांगावं लागत नाही. आपण कुठल्या परिस्थितीत जगतो, आपले पालक रक्ताचं पाणी करून आपल्याला कसं शिकवतात, याची आठवण सतत जागी असेल ना, तर शाळेच्या वर्गातल्या अभ्यासानंही मार्क्स मिळतात. क्लासेस बिलासेसची चैन झोपाळू मुलांसाठी.!"
मला रिक्षापर्यंत सोडायला रामकृष्ण बरोबर आला. तिथेही बोलत राहिलो बराच वेळ. बोलता बोलता तो चटकन बोलून गेला. "सर, भोवतीची मुलं पाहुन केव्हातरी मलाही थोडी झापड आल्यासारखं होतं."
"मग, अशा वेळी...?"
"मी... मी फक्त आईचे डोळे आठवतो."
"आई "
"राब राब राबायची ती.... कागदाच्या पिशव्या करत. गोंद-कात्र्या घेऊन आम्ही तिच्याभोवती बसून तिला मदत करायचो. वडिलांची गिरणी संपानंतर बंदच पडली. त्यानंतर वनवास मागे लागला. शेवटी ती बोलायची, 'मी काही आता जगत नाही; पण तुझ्याकडे माझे डोळे कायमचे असतील. तु कसा शिकतोस, तु कसा मोठा होतोस, ते पाहण्यासाठी.' सर, ते डोळे आठवतात हो !"
रिक्षात बसलो तेव्हा हेच आठवत राहिलं. सतत कुणीतरी आपल्याला सांगावंच का लागावं ? 'अभ्यास करा, लवकर उठा, पालक किती मरमर मरतात आपल्यासाठी याची आतून जाण असणारा असा एखाद् दुसराच !"
परवा एक शिक्षिका असलेली पालक आई स्टाफरूममध्ये विषण्ण चेहऱ्याने आली, "मुलगा सकाळी उठतच नाही हो. सातचं लेक्चर नेहमी बुडवतो. ऐकतच नाही. आता म्हणतो, शिकायचं नाही. काही करायचं नाही. कुणाचं मुळी ऐकतच नाही." फक्त रडायची बाकी होती ती बाई.
खूप काही सुंदर घडविण्याचा तारुण्याचा ऋतू संपून गेल्यावर कितीतरी विद्यार्थी जागे होतात, तेव्हा उशीर झालेला असतो. एक भकास दुपार... आणि निराश संध्याकाळ !
सकाळी उठण्यासाठी 'जबरदस्ती,' कॉलेजला जाण्यासाठी 'जबरदस्ती', मग शिकण्यासाठी.. परीक्षेसाठी.. त्याआधी वर्गात हजर राहण्यासाठी 'जबरदस्ती.!' जबरदस्तीनं कधी फूल उमलतं का ? रोपानं स्वतःहूनच आतून ठरवलेलं असतं. विद्यार्थ्यांनंही असं आतूनच ठरवायला हवं.आईचे, बाबांचे डोळे आठवण्यासाठी ते प्रत्यक्ष मरायलाच हवेत का ?
आपण वर्गात गुंडगिरी करताना किंवा वाह्यात वेळ घालवताना, चाचणीत शून्य मार्क मिळवताना, बसमधून/लोकलमधून लोंबकळत येणारे आई-वडील आपल्याला का आठवत नाहीत? मुलांसाठीच पैसे जमा करायला सारखे वेगवेगळ्या ठिकाणी कंपनीच्या कामासाठी वाऱ्या करणारे थकलेले बाबा का आठवत नाहीत ?
घरात आपण लहान असू, पण जाणीवेनं थोडं समजूतदार झालो तर पालकांच्या घामाचं गुलाबपाणी होऊ शकतं.
यशाची राइसप्लेट रेडीमेड मिळत नाही, हे आत्ताच कळायला हवं. यश शिजत ठेवावं लागतं.. परिस्थितीच्या धगीनं. कधी महत्त्वाकांक्षेच्या इंधनानं आयुष्य उकळत ठेवावं लागतं. हे केव्हा कळणार? चाळीसाव्या वर्षी ?
मी स्वतः एस.एस.सी. ला असताना फॉर्म भरायला पैसे नव्हते तेव्हा आईच्या हातातली शेवटची सोन्याची बांगडी गहाण टाकण्यासाठी (तीही कधीच न मिळण्यासाठी ) निघालेले माझे वडील मला आठवले.
आई म्हणाली- "ही शेवटची. पुढे काय?"
अजुनही घरातले ते क्षण आठवताहेत. नातेवाईकांनी केलेली उपेक्षा आठवते. निष्कांचन आईला पुढे येऊ न देणारे नातेवाईक आठवले. कुणाच्या तरी लग्नात "माझी बोरमाळ तू घाल थोडा वेळ, अगदीच काळी पोत बरी दिसत नाही," असं आईला म्हटल्यावर, "माझी लाज वाटत असेल तर मी येणार नाही. आले तर जशी आहे, तश्शीच येईन !" हे बाणेदारपणे सुनावणारी आई आठवली. आणि नंतर ती म्हणाली होती- "माझा दागिना बघायचा असेल तर माझा मुलगा पहा." आईच्या त्या वाक्याने केवढी जबाबदारी टाकली होती माझ्यावर, ते आठवलं.
असे प्रसंगच झपाटून शिकणाऱ्या मुलांच्या आयुष्यात निरांजन होऊन येतात. दारिद्र्य माणसाला संपवू शकत नाही. पण आळस, उदासीनता, ध्येय-शून्यता पार नेस्तनाबूत करते माणसाला.!
मला दिलेल्या एका मुलाखतीतलं आशा भोसले यांचं वाक्य आठवलं, "सुखी माणूस कधी कलावंत होऊच शकत नाही."
खुप काही प्रेरणा देणारी ही रसरसलेली आयुष्यं तेव्हाच घडतात, आकाराला येतात, जेव्हा जगाच्या पाठीवर आपण कुठेही असलो तरी आपल्याला आठवत असतात कष्टाळू, अपार विश्वासाने कर्तृत्व गाजविण्यासाठी जगात ज्यांनी आपल्याला पाठविलं आहे असे आपल्यासाठी स्वप्न पाहणारे आईचे डोळे ! आपल्या आईचे डोळे... !!!

प्रविण दवणे

# जे होत ते चांगल्यासाठीच



आधुनिक केसरी

एकदा अकबर आणि बिरबल शिकरीला जात असतात, तलवार काढताना अकबरचा अंगठा कापला जातो अकबरला खूप त्रास होतो, तो ओरडायला लागतो तो शिपायांना वैद्य घेऊन या म्हणून म्हणून शहरात पाठवतो. तेवढ्यात बिरबल त्याच्या जवळ जातो आणि म्हणतो, "महाराज शांत व्हा जे होतं ते चांगल्यासाठीच होतं"
अकबरला राग येतो. तो जास्तच चिडतो आणि शिपायांना सांगतो "जा बिरबलला घेऊन जा, रात्रभर उलटं टांगून ठेवा. आणि सकाळी-सकाळी फाशी द्या" सर्व शिपाई तिथून निघून जातात. अकबर एकटाच जंगलात असतो. तो एकटाच पुढे शिकार करायला जातो!!
पुढे काही आदिवासी त्याला पकडून घेऊन जातात, आणि त्याला डांबून ठेवतात.. अकबरची बळी ते देणार असतात. त्यासाठीची विधी करण्यात आदिवासी मग्न होतात.तितक्यात एका आदिवासीची नजर अकबरच्या तुटलेल्या अंगठ्याकडे जाते व तो ओरडून सर्वांना सांगतो, "हा अशुद्ध आहे, आपण याची बळी नाही देऊ शकत याचा अंगठा तुटलेला आहे.
आदिवासी अकबरला सोडून देतात आणि त्याला बिरबलचं बोलणं आठवतं, 'जे होतं ते चांगल्यासाठीच होतं..' तो धावत पळत त्याच्या महलात येतो, बिरबल ला फाशी होणारच असते तितक्यात तो तिथे जाऊन बिरबलला घट्ट मिठी मरतो आणि सर्व हकीकत सांगतो. आणि म्हणतो, "मला माफ कर. तुझ्यामुळे मी वाचलो आणि बघ माझ्यामुळे तुझी काय हालत झाली."
'बिरबल हसतो आणि म्हणतो, "नाही महाराज. जे होते ते चांगल्यासाठीच होते" अकबर स्तब्ध होतो आणी विचारतो असं कसंतुला माझ्यामुळे खूप त्रास झालाचांगलं कसं झालं? त्यावर बिरबल म्हणतो, "महाराज मी जर तुमच्यासोबत शिकरीला आलो सतो तर त्यांनी माझा बळी दिला असता.. म्हणून म्हणतो जे होतं ते चांगल्यासाठीच होतं.
**तात्पर्य :** मित्रांनो, आयुष्यात असे क्षण येतील जेंव्हा तुम्ही खचून जाणार, पण लक्षात ठेवा जे होतं ते चांगल्यासाठीच होतं.कदाचित पुढे त्याचा ऊपयोग तुमच्या चांगल्यासाठी होईल!!!

## विदूषक



**सर्कशीतला विदूषक
बुटका होता भारी
पोट त्याचं अगडबंग
हसायची त्याला सारी**

**लाल रंगाचे जॅकीट
टोपी त्याची नक्षिदार
मजेदार किस्से
सांगायचा फार**

**हात खिशात घालून
डुलत डुलत चालायचा
कधी शांत रहायचा
तर कधी जास्त बोलायचा**

**शोभून दिसायचा त्याला
लांब पट्ट्याचा सूट
टप-टप वाजवायचा
उंच टाचेचा बूट**


**गंभीर चेहरा करून
जाग्यावर बसायचा
प्रेक्षकांनी टाळ्या वाजविता
जोरजोराने हसायचा**

**- रवींद्र व्ही. चालीकवार
महागाव, जि. यवतमाळ**

## नक्कल



**चला मित्रहो लढऊ शक्कल
फेरीवाल्याची करूया
नक्कल
चणे-घ्या-चणे
छान छान चणे
फेरीवाल्याचे म्हणूयात गाणे
गाणे ऐकून धावतील पोरे
म्हणतील आम्हाला चणे द्यारे
होईल त्यांची फसगत भारी
गंमत कळल्यावरती सारी
लबाड म्हणतील कोल्हे
कुठले
आमच्या तोंडा पाणी सुटले
खुद खुद खुद खुद हसू येईल
सुट्टीही आपुली मजेत जाईल
-भानुदास धोत्रे
परभणी**





# मराठा वर्चस्व किती खरे किती आभासी

आधुनिक केसरी

**जात , राजकारण आणि अर्थकारण हा आधुनिक सामाजिक शास्त्रीय संसोधनाचा केंद्रबिंदू नसला तरी महत्वपूर्ण बिंदू आहे . मराठा वर्चस्व आणि महाराष्ट्रीय कॉंग्रेस व्यवस्था वर्चस्व या दोन संकल्पना एकध्वनी वाटाव्या अशी परिस्थिती महाराष्ट्रात एकेकाळी होती.आजमितीला कॉंग्रेस व्यवस्थेचे मराठाधारित आर्थिक वर्चस्वाचे प्रतिमान राजकीय सत्तेच्या केंद्रस्थानी नसले तरी राजकीय सत्ताव्यवहाराची चौकटीचा तो एक कोन आहे ही वस्तुस्थिती आहे .या पृष्ठभूमीवर महाराष्ट्राच्या राजकारणाचे संशोधक व पुण्यातील युनिक फौंडेशनचे कार्यकारी संचालक डॉ विवेक घोटाळे यांचे मराठा वर्चस्वाचे बदलते आकृतिबंध आणि महाराष्ट्राचे सत्ताकारण : समाज आणि अभिजनांचे पेच हे चिकित्सक पुस्तक प्रकाशित झाले आहे .**

आर्थिक वर्चस्वाच्या या प्रतीमानाचे पुढील घटक दिसतात.

१. मतदारसंघातील स्वतः किंवा वाडवडिलांनी स्थापन केलेले सहकारी कारखाने

२. अवसायानात आलेल्या कारखान्यांची प्रत्यक्ष अप्रत्यक्षरीत्या मिळवलेली मालकी

३. स्व प्रवर्तक असलेले खाजगी कारखाने

४ .सहकारी अथवा खाजगी दुध डेअरी

५ .अनुदानित अथवा विनाअनुदानित शिक्षण संस्था / अभिमत विद्यापीठे वर्चस्वाचे हे प्रतिमान विधानसभा मतदारसंध केन्द्री आहे . विशिष्ट घरांकडे केंद्रित आहे . समाजवादी , डाव्या चळवळीत आणि दोन्ही कम्युनिस्ट पक्षांना आणि दोन्ही शेतकरी संघटनाना अश्या प्रकारच्या आर्थिक प्रतीमानाचा विकास करता आला नाही .किंबहुना अश्या प्रतिमानांच्या विरोधात या चळवळी पक्षांनी भूमिका घेतली .पण सक्षम आर्थिक प्रतिमानाचा पर्याय देऊ न शकल्यामुळे या चळवळी – पक्ष काही मतदारसंघापुरत्याच मर्यादित राहिल्या .

जनता बँक साखळीच्या माध्यमातून संघपरिवाराचा आर्थिक प्रतीमानाचा उभारणीचा प्रयत्न ठाणे ,पुणे ,नागपूर या शहरी मतदारसंघापुरता मर्यादित राहिला . शिवसेनेला या प्रकारच्या राजकीय अर्थकारणाची अत्यल्प जाणीव आहे . गोपीनाथ मुंडे ,नितीन गडकरी यांनी वैद्यनाथ कारखाना ,पूर्ती उद्योगसमूह याद्वारे असे प्रतिमान उभे करण्याचा प्रयत्न केला .मात्र तो त्यांच्या मतदारसंघ किंवा परीसरापुरताच मर्यादित राहिला . भाजपला एकट्याला महाराष्ट्रात अद्याप साधे बहुमत मिळालेले नाही,याचे कारण या पक्षाला असे राजकीय अर्थशास्त्रीय प्रतिमान उभे करता आलेले नाही हे असावे .

१९६२ ते २०१९ या काळात महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत किमान १२५ ते कमाल १४० आमदार सातत्याने मराठा जातीपुंजातील निवडून आले आहेत हे डॉ घोटाळे यांनी स्पष्ट केले आहे. अर्थात मराठा आर्थिक वर्चस्व हा एक संपूर्ण वास्तव नाही. जे वर्चस्व होते ते काही घरांचे होते. मध्यमवर्गीय किवा सर्वसामान्य मराठा वर्गाचे हे वर्चस्व नव्हते. सर्वसामान्य मराठा अन्य मागासवर्गीयांच्या आर्थिक रेषेवरच होते. काँग्रेसमधील मराठा वर्चस्व दोन कारणांमुळे टिकून होते. एक प्रबळ विरोधी पक्षाचा अभाव व दोन मराठा पर्यायी सामाजिक आर्थिक समीकरणाचा अभाव. साठीमध्ये निर्माण झालेले हे प्रतिमान नव्वदीपर्यंत टिकले .मंडल आयोगाची अंमलबजावणी ,नवे आर्थिक धोरण यानंतर परीस्थिती बदलली.

ऐशीच्या दशकापर्यंत मात्र काँग्रेस अंतर्गतच यशवंतराव चव्हाण,शंकरराव चव्हाण आणि वसंतराव दादा पाटील या तीन गटात सत्ता स्पर्धा अस्तित्वात होती .रेड्डी काँग्रेसने इंदिरा काँग्रेसशी एकीकृत व्हावे की नाही या मुद्द्यावरून वसंतदादा पाटील , वसंतराव नाईक आणि शरद पवार यांच्यामध्ये मतभेद होते. या मतभेदातून पुढे पुलोद प्रयोग झाला .परिणामतः महाराष्ट्रात काँग्रेस वर्चस्व आणि मराठा वर्चस्व या दोन्हीला धक्का बसला .

अपवाद वगळता महाराष्ट्रातील साखर नेते ( सहकारी अथवा खाजगी ) पवार गटाबरोबर राहतात.महाराष्ट्रात दलित नेतृत्व पुन्हा नको या मुद्द्यावर दोन्ही काँग्रेसमधील मराठा गट एकत्र आले ( २००४ ) राजू शेट्टी कोणत्या जातीचे हे शोधले गेले . शिराळ्यात लिंगायत पाटील नको म्हणून प्रसंगी शिवसेना उमेदवाराला सा रे पाटील यांच्या विरोधात निवडून दिले गेले .यातून मराठा वर्चस्वाच्या बहुजनवादी असण्याच्या दाव्याला मर्यादा आल्या. दुसरीकडे भाजपकडे सर्वमान्य मराठा नेतृत्व नाही . यातून भाजपला मोठा पक्ष असूनही एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद द्यावे लागले.दोन्ही छत्रपती घराण्यातील प्रतिनिधी काही काळ भाजपबरोबर राहिले. पण त्याचा भाजपला विशेष फायदा झाला नाही .कारण पश्चिम महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील सर्वसामान्य मराठा तरुण लोकनेते शरद पवार यांच्यामागेच उभा राहिला .दुसरीकडे पवार अमोल कोल्हे ,धनंजय मुंडे या ओबीसी नेत्यांमागे ठामपणे उभे राहिले .याउलट भाजपमध्ये बावनकुळे ,तावडे यांची तिकिटे कापली आणि रोहिणी खडसे ,पंकजा मुंडे यांना पुरेसे पाठबळ भाजपकडून दिले गेले नाही. भाजपने मराठा आरक्षणाचा निर्णय केला.मात्र हा विषय न्यायालयात गेला. आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा व ओबीसी मतभेद असले तरी ओबीसी वर्ग थेट विरोध करण्यापेक्षा शांत राहून सोबतच करतो .पण मोर्चानंतर ओबीसी वर्गात निर्माण झालेली असुरक्षतीततेची भावना भाजप दूर करू शकला नाही. भाजपला याचा किनारी स्वरूपाचा फटका २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत बसला असावा असे महत्वपूर्ण निरीक्षण विवेक घोटाळे यांनी नोंदविले आहे .

विशेष म्हणजे मुख्यत्वे मराठा पक्ष अशी ओळख असणारा पवार गट स्वबळावर सत्ता प्राप्त करू शकला नाही . मनोहर जोशी( ३५ अपक्ष आमदारांचा पाठींबा जे नंतर राष्ट्रवादीत गेले, सुशीलकुमार शिंदे, देवेंद्र फडणवीस ( २०१४ पवारांची भाजपला पाठींबा देण्याची घोषणा -त्यावेळी अत्यल्प काळ शिवसेनेचे एकनाथ शिंदे विरोधी पक्ष नेते होते ),उद्धव ठाकरे हे नॉन मराठा व्यक्ती पवार गटाच्या प्रत्यक्ष अप्रत्यक्ष पाठींब्याने मुख्यमंत्री झाले .

मराठा जातीपुंजामध्ये खरे तर दोनच प्रकार आहेत. एक सत्ताधारी मराठा आणि सत्ताहीन मराठा व दुसरा संसाधनयुक्त मराठा आणि संसाधनविरहीत मराठा .मराठा मोर्चाने संपूर्ण मराठा जातीपुंज कायमस्वरूपी एकसंध झाला हेही एक मिथक ठरू शकते. कारण सेवा संघ, छावा संघटना, ब्रिगेडचे दोन गट, महासंघ, छत्रपती संभाजीराजे यांना माननारा गट, मराठा मोर्चातील दोन गट असे विविध गट कायम आहेत. बुद्धीजीवी आणि भांडवलदार यांच्याशी असलेली सर्वपक्षीय मराठा सत्ताधारी वर्गाची युती हाही मराठा वर्चस्वाचा एक पदर आहे . दुसरीकडे माध्यमे, साहित्य, उद्योग ,व्यापार या सर्वच क्षेत्रात मराठा तसेच मराठेतर ( मुख्यत्वे शिक्षण साहित्य क्षेत्रात नवबौद्ध व उद्योग व्यापारात मराठा ) यांचे प्रभावक्षेत्र निर्माण होऊ लागले आहे या वास्तवाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. मारवाडी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जाती-वर्गातील माहेश्वरी जातीच्या राजकीय सहभागावर संशोधन करताना, व्यापार म्हणजे फक्त मारवाडी नव्हे असे अनेक जुन्या मारवाडी व्यापारी धुरिणांनी मला बोलून दाखविले होते .

आज मराठा समाजासमोर उभ्या असलेल्या आव्हानांना सामोरे जाताना, महाराष्ट्राने महर्षी विठ्ठल रामजी शिंदेकृत सर्वसमावेशक भूमिका घेणे आवश्यक असल्याचे डॉ घोटाळे यांनी समारोपात सुचविले आहे.

भारतातील प्रादेशिक राजकारण,त्यातील जात व अर्थकारणाची भूमिका, त्याचे उपप्रादेशिक पदर , राजकीय अर्थशास्त्र या संदर्भात डॉ घोटाळे यांच्या संशोधन पुस्तकाने मोलाची भर घातली आहे.

मराठा वर्चस्वाचे बदलते आकृतिबंध आणि महाराष्ट्राचे सत्ताकारण : समाज आणि अभिजनांचे पेच, द युनिक फौंडेशन, पुणे, आवृत्ती पहिली , जुलै २०२२,पाने ३१९, मूल्य ४५० रु.

**डॉ. श्रीनिवास भोंग**
**९४२३७८३२३५**

# सर्वव्यापी माणसांचा अनुबंध मांडणारी कविता

आधुनिक केसरी

**जालना येथील ज्येष्ठ मराठी, उर्दू कवी सुनील लोणकर यांच्या "सर्वव्यापी कच-यात राहूनसुद्धा" या कवितासंग्रहाचे प्रकाशन प्रसिद्ध कवी प्रा. डॉ. दासू वैद्य आणि सतीश सोळांकुरकर यांच्या हस्ते आज 24 सप्टेंबर रोजी दीनदयाल उपाध्याय सभागृह, विद्युत कॉलनी, जालना येथे सायंकाळी 5 वाजता होणार आहे. यानिमित्त हा विशेष लेख.**

**पुस्तक परिचय**

**डॉ. प्रभाकर शेळके, जालना**

कवीवर्य सुनील लोणकर उर्फ 'दर्द' या शायराची अतिशय चिंतन आशयसंपन्न कविता "सर्वव्यापी कच-यात राहूनसुद्धा" आयुष्यातील पहिला मोठा जीवन जगण्याचा ताळेबंद मांडतानाही प्रगल्भ सृजन जाणीवेची मुक्त व्यक्त आशयघन कविता मनाचा अथांग ठाव मांडते.

आयुष्याच्या भविष्याकडे सतत वाहणारी नितळ निर्लेप अभिव्यक्ती या कवितेने दिली आहे. ही सर्वव्यापी कच-यातही माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती जीवघेणी जगण्याची धडपड आहे. हा मानवी समूह वृती प्रवृतीचा सर्वव्यापक भावकल्लोळ आहे.

"बाकी कविता म्हणजे असतं तरी काय?
असते आयुष्याची ठेव, जमा वजा बाकी.
काळाकडे गहाण ठेवलेली (फक्त कविताच)

कवितेविषयी अत्यंत सहृदय कवितेचं मन कागदावर उतरवून ठेवणारी ही प्रगल्भ व तरल कविता आहे. पावसावर कविता लिहावी असे वाटत नाही, मनस्वी कासावीस होणे, कविता न सुचणे ही एक प्रचंड अनामिक हुरहूर ओढ या कवितेतून येते.

सर्वव्यापी कच-याच्या खच्चून कचाट्यात राहूनसुद्धा आयुष्यात वाचलेले साहित्यसम्राट याविषयी एक प्रचंड वास्तवाचा भडका देणारी कविता अशी आहे. कवीच्या मनाचं समज-दार उघडताना ते लिहितात. "कविता आरक्षणातून बाहेर पडली पाहिजे" एका कवी प्रतिमेच्या प्रचंड आत्मिक भावनेने ही कविता सर्वव्यापी होऊन जाते. "जिथं स्वतःची भीती वाटते मला", आता असं वाटतंय, सांगावं वाटतं मला,

शब्दाशिवाय असतो तेव्हा, शब्दही आता, या संपन्न मांडणीत ही कविता प्रचंड प्रचंड आशयघन सत्य अभिव्यक्ती देऊन जाते. पण कवीची कविता संपत नाही.

या संपूर्ण कवितेचा शोध हा एक सृजनशील अनुबंध आहे.

यात प्रियवृती सन्मित्र, प्रियकर, प्रेयसीचे, तुझे संपन्न संवाद, संदर्भ, तुझ्या आठवणी, कविच्या अंतस्थ अंतःकरणी एक कवितेची लय, ताल, नाद असल्याने, जणू आवडीचं गाणं संपल्यावर स्वर अभंग होऊन अंगभर निनादत रहातो. एक नितळ निर्लेप अभिव्यक्ती देणारी ही कविता मनसोक्त अभिव्यक्ती आहे.


जीवनाच्या अथांग पायवाटेने ही कविता जगण्याला उभारी देते.

या कवितेने कवीला भरभरून मुक्त व्यक्त घनघोर आनंद दिला.

"उर्मी"

"आम्ही कवितेचे देणं लागतो" "मळलेल्या पायवाटा" असे आशयघन शब्द या कवीचे आहेत. आम्ही मुग्ध होत गेलो, ऐकत गेलो. एक कातरवेळ कवितेची, "तूच-तू" कवितेनं एक काळजाची रेघ शोधताना, कवी अतिशय नादात व भानात, भ्रमाचे अडढथळे, संदर्भाचे आक्रमण..हे संवादी संदर्भ देत कविता अशी आहे.

"मृगासारखी कस्तुरी जशी माझ्यात तू"




माझी भटकंती मात्र,
फक्त तुझ्यासाठी कवितेतून"...(तूच-तू)

या कवितेच्या प्रचंड ऊर्मीने ही कविता अतिशय सुरेख अतीव आत्मिक भावपूर्ण कविता होऊन येते. कविता म्हणून केवळ कविता जगणारा, हिंदी उर्दूचा शायरीची दर्दभरी दास्तान मांडणारा हा कवी. मनातली ऊर्मी कवितेच्या सर्वव्यापी कच-यात राहून सुद्धा आयुष्य कसे निरभ्र, जगावे! कविता म्हणजे कवीला जगण्याची एक सृजनशील ऊर्मी वाटते. ते लिहितात...

"कविते,
तू एक प्राणांतिक ओढ, एक उर्जा,
ऊर्मी बनून आहेस माझ्यासाठी,
कायमची."......(ऊर्मी)

प्रत्येक कवीच्या जीवनात सहधर्मचारिणी असते. कवी सुनील लोणकर दर्द यांचे मन याची ग्वाही देते. "निर्मोही" होण्याचा वसा, तिचे व्रतस्थ जगणे, कवीचा सारा वैताग सांभाळणे. बेलगाम जगण्यालाही वळण देत, वळणावर आणणारी. शब्दाने शब्दावर भाळायला शिकवणारी, आपल्या पत्नीविषयी कृतज्ञतेचे भाव व्यक्त करून, आयुष्य समृद्ध केले. "तू होतीस म्हणून..." कातरवेळी सच्चेपण मांडताना कवीच्या मनात कधीचं लुच्चेगीरी आली नाही. हीच सच्चेगीरीची कविता सुनील लोणकरांची आहे. मराठीत ग्रेसच्या नंतर एवढी तरलं आशय संपन्न कविता वाचताना तप्त तव्याचा हळूवार भाव, व शब्द शिडकावा या कवितेने दिला आहे. आयुष्याची उमेद वाढवणारी, तू मनस्वी कविता माझ्या करीता, तुझ्या वाढदिवसाचे निमित्त , तुला भेटण्यपुर्वी, वाढदिवस कवीचा, पाऊस संध्याकाळचा, मन भिजत नाही, पावसालाही द्यावा लागतो थारा, अशा तरलं आशय संपन्न रचना मनस्वी करून जातात. ही कविता म्हणजे प्रियवृती मनात झिरपत, रूजवून खोल ओल सांगणारी आहे. या कवितेचा प्रवास अखंड व्यापक सामाजिक संदर्भ देत माणूसवेल्हाळतेचा सर्वव्यापक कचरा दूर लोटतो. मनाचं नितळ निर्लेप झरलेपण व्यक्त करणारी ही कविता. निव्वळ माणूस म्हणूनही ओळख देणारी कविता. कवितेनं कवीला आयुष्य शिकवलं, माणूस म्हणून वावरताना "कवी होऊन जगणे, खरच अवघड असते," ही सुखासीन भाग्योदय भावना कवी व्यक्त करतो. समजुतीच्या वयात धडा शिकलो. कवितेचा प्रवास करताना, शब्दाशिवाय मौनाचे अर्थ उलगडत नाही. किंवा कवितेमुळे मी न माझा राहिलो.

ही अमोघ ओळख कवीला मिळाली. कवितेचा अव्याहत प्रवास करताना कवी स्वानंद स्वकरीता जगलाच नाही. "सर्वव्यापी कच-यात राहून सुध्दा "!!..एक भणंग आवलिया होऊन शब्दगंध वाटीत निघालेला हा कवी या व्यवस्थेत माणूसबंधाचा अनुबंध बांधित निघाला आहे. म्हणून ही कविता सर्वव्यापी आहेच. पाऊस ही सृष्टीची सृजन भावना. तशी प्रत्येक कवीची, उत्कट प्रफुल्ल, भावना व्यक्त होते. विविध ढंगी पाऊस या कवितेचा आत्मा आहे.

"मन भिजत नाही, "द्यावाचं लागतो थारा"
"निरागस पाऊस, 'पाऊस पडणं म्हणजे', 'पाऊस देवदूतच की हो!',' शक्ती-थेंब पाण्याची, 'पावसा विषयीची श्रध्देय भावनां व्यक्त केली आहे.
'पाऊस निरागस झोपी गेलेल्या मुलासारखा,
पावसाचा थेंब म्हणजे एक सृजनशील शक्ती.

चैतन्य निर्माण करणारी. सुनील लोणकर यांच्या कवितेने सामाजिक जाणीवे सहित एक अखंड झरा वाहत रहावा व माणूस म्हणून केवळ वर्धमान वृद्धींगत व्हावा अशी निर्लेप भावना या कवितेने दिली आहे. अशी ही कविता मनातल्या खोल डोहात घेऊन जाते. माणूस म्हणून जगावं, अशी निथळून सांगणारी ही कविता. कवी म्हणतो,"जगण्यासाठी"

"आम्ही कवितेचं देणं लागतो.
पोटासाठी भूक,अन् जगण्यासाठी
तू कविता दिलीस,...
शाप नाही वरदान आहे आयुष्य".....(जगण्यासाठी) हा कवी म्हणून जगण्यावरचा अदम्य विश्वास या कवितेने दिला आहे.

आत्ममग्न चिंतनाचा आलेख चढत जाऊन, मुक्या शब्दांना, मौनाची भाषा कळते, कवी मनस्वी होऊन कविता लिहित जातो, भुरळ पडावी तशी कविता प्रसवत राहतो. काव्यमुग्धतेचे तब्बल चाळीस वर्षे अखंड हिंदी मराठी काव्य रचना या कवीने केली आहे. कवितेसाठी निःसंग होऊन दिवसं कवितेचे घेऊन जगणे ही एक निस्सीम कलावंताची भक्ती असते. ते लिहितात.

"शब्द होतात मुके,मौन बनते भाषा.
सुचत नसते तेव्हा काहीच,
कविता मात्र आतल्या आत, भुरळ पडलेल्या मनात,
प्रसवत उलगडत राहते".....(भुरळ)

या कवितेची ठेवण शांत संयत असल्याने ही कविता हळूवार उलगडत जाते. उगीचचं शब्दांचा आटापिटा नाही की आदळ आपट नाही. ही कविता मौलीक मौनाचा आवाज देते की, "भिती वाटते मला आजकाल" यातून उलगडत जाणारे, आर्त विराणी स्वर, मी माझ्या आप्तस्वकीयाकडून दुरावला जातोय, ज्या दुरच्या निबिड प्रदेशात मला माझी ओळखीची दिसत नाहीत..असा एक हळवा किनारा या कवितेने दिला आहे. प्रचंड आशावादही देऊन जाणारी ही कविता. कवी कविता नव्याने भेटण्याची सातत्याने वाट पाहतो. ती अस्वस्थतेची वेदना मांडते. झिरपत जाते. "खरंतर, स्वतःशी बोलायलाही अजून जमलं नाही...तरीही, आधी हे जीवन, आयुष्याकडे गहाण ठेवल्यागत..नाहीतर एका निर्धारानं जगायचय मला..

"आयुष्य एवढंच सांगावसं वाटतंय मला".." मन वाचायला चष्मा लागतं नाही. "कविता सहृदय होऊन येते.

या कवितेतून पाऊस, ती, त्याची सहचारिणी, समुद्र या उत्तम कविता आहेत. या कवितेचा अनुबंध चिंतन आशय संपन्न आहे. ही मनस्वी मानवी भावभावनेचा नितळ निर्लेप अभिव्यक्तीचा थांग अथांग सांगणारी एक सृजनशील हळवी कविता आहे. या कवितेची समग्र प्रस्तावना, ज्येष्ठ कवी सतीश सोळाकुंरकर दिली आहे. आशयमुग्ध मुखपृष्ठ ख्यातकीर्त श्रीधर अंभोरे यांचे आहे. कवीवर्य निर्मोही "मैफल " प्रकाशन भुसावळ. पाठराखण सन्मित्र संजय जाधव यांनी केली आहे. एकूण मनस्वी हा काव्यसंग्रह आहे...हार्दिक शुभेच्छा.

सर्वव्यापी कच-यात राहून सुद्धा
(काव्यसंग्रह)
कवीः-सुनील लोणकर दर्द
प्रकाशकः-मैफल प्रकाशन, भुसावळ
प्रथमावृत्तीः-५ऑगस्ट २०२२
मूल्यः-रूपये ११३

मनोजवं मारुततुल्यवेगमं जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्।
वातात्मजं वानरयूथमुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये।।



**श्री भद्रा मारोती औरंगाबाद**

सौजन्य : जयसुख पटेल, जय भद्रा हनुमान सुखःतू रामायण, सिमंत गल्ली, शहागंज गांधी पुतळ्याजवळ, औरंगाबाद. मो : 9422201977

# जामठी येथे माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी; शेतकऱ्यांना मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** राज्यात दिनांक ०१ सप्टेंबर २०२२ ते ३० नोव्हेंबर २०२२ या कालावधीत मराठवाडा व विदर्भ विभागातील शेतकऱ्यांच्या नैराश्य व त्यातून उद्भवणाऱ्या आत्महत्या यावर प्रभावीपणे उपाययोजना करून शेतकरी आत्महत्या होणार नाहीत तसेच बळीराजाला सुखाचे दिवस यावेत याकरिता " माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी " या उपक्रमाची सुरुवात प्रत्येक तालुक्यात करण्यात आली आहे त्यानुसार सोयगांव तालुक्यात आज दि.22-09-2022 रोजी मौजे जामठी येथे सोयगाव कृषि विभाग तालुका कृषी अधिकारी एस.जी. वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा पंधरवाडा "माझा एक दिवस माझ्या बळीराजासाठी"क्षेत्रीय किसान गोष्टी घेण्यात आला.



सेवा पंधरवाडा कृषी विभागाच्या विविध योजना विषयी सविस्तर मार्गदर्शन कृषी विज्ञान केंद्राचे विषय विशेषज्ञ अशोक निर्वळ यांनी सांगितले.व आत्मा यंत्रणा यांचे मार्फत विविध घटकांचे आयोजन करण्यात आले होते.आजच्या कार्यक्रमात प्रामुख्याने महसूल, जलसंधारण, ग्रामविकास, वीज खात्याच्या संदर्भातील अडचणी याबाबत चर्चा, पतपुरवठा व सामाजिक सुरक्षा, तंत्रज्ञान प्रसार, पिक वैविधिकरण तसेच शेतकऱ्यांना मार्केटशी जोडणे या विषयी आवश्यक त्या उपाययोजना याविषयी सरपंच व गावातील प्रगतशील शेतकरी तसेच उपसरपंच यांचेशी चर्चा करून गावचा प्रगतीचा आलेख सुधारण्याविषयी नियोजन करण्यात आले.आजच्या कार्यक्रमात एस. जी. वाघ तालुका कृषि अधिकारी सोयगांव प्रत्यक्ष बांधावर जाऊन कापूस व मका पिकाविषयी माहिती देऊन कृषि विविध योजनांचा लाभ घेण्याविषयी मार्गदर्शन केले.
टि. बी.चव्हाण, हेमंत देशमुख कृषि पर्यवेक्षक, एस.एस.पाटील कृषि सहाय्यक यांनी माहिती सांगितली जामठी यांनी कापूस व मका पिकावरील किड व रोग याविषयी करावयाच्या उपाययोजना याविषयी माहिती दिली.यावेळी सोयगाव कृषी विभागाचे कर्मचारी कृषी पर्यवेक्षक अतुल पाटील, ए.एस. बावसकर, कृषी सहाय्यक मानसिंग भोळे(राजपूत),मयूर पाटील,आत्मा बी टी एमचे अमोल महाजन, सोयगांव यांनी शुद्धा मार्गदर्शन केले. गट व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेची माहिती दिली.यावेळी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावळदबारा येथे काळ्या जादूच्या अफवांना आला जोर

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा गावामध्ये काळ्या जादूच्या अफवांना जोर आलेला आहे. सावळदबारा गावांमध्ये रात्रीच्या वेळेस निर्वस्त्र स्त्री फिरत असल्याची अफवा गावामध्ये वाऱ्यासारखे पसरली आणि गावामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. गावामध्ये बऱ्याच लोकांच्या घरासमोर रात्रीच्या वेळेस कोणीतरी व्यक्ती हळद कुंकू गुलाल टाकून त्यावरती काळी बाहुली लिंबू मिरची टाकत असल्याचे समोर आले. परंतु ती व्यक्ती कोण आहे याबाबत अजूनही समजले नाही रात्रीच्या वेळेस गावातील लोक एकत्रित येऊन रात्र-रात्र गावात गस्त घालत असल्याचे दिसून येते. मात्र ती स्त्री आतापर्यंत कुणाला दिसली याबाबत समजलेले नाही याबाबत गावांमध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. रात्रीच्या वेळेस निर्वस्त्र स्त्री फिरत असल्याच्या चर्चेला मात्र गावांमध्ये उधाण आलेले आहे, त्यामुळे स्त्रिया आणि लहान मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. अंधश्रद्धा निर्मूलन समितीने याबाबत जनजागृती करणे गरजेचे आहे.
सुशिक्षित माणसे ज्या आधुनिक जगात वावरतात त्यामध्येदेखील खडे, भाग्यरत्ने, रुद्राक्ष, अंगठया यांचा वापर, वास्तुशास्त्राप्रमाणे स्वतःच्या घरातील बदल, नारायण नागबळीची पूजा अशा अनेक कृतींद्वारे हेच दाखवून देत आहेत की, अजूनही त्यांच्या मनातील यातुनिर्भर श्रद्धा कायम आहे. याचे एक कारण म्हणजे विश्वातील अनेक गूढं माणसाला उकललेली नाहीत. यासाठीच महाराष्ट्र शासनाने अंधश्रद्धा निर्मूलनासाठी कायदा करत असताना श्रद्धा कोणत्या व अंधश्रद्धा कोणत्या यातून वाद निर्माण होऊ नये म्हणून कायद्याचे नाव 'महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा आणि जादूटोणा यांना प्रतिबंध व त्यांचे समूळ उच्चाटन अधिनियम २०१३' असे केले आहे.
अशा अफवांवर विश्वास ठेवू नये अशे आवाहन प्रा.जीवन कोलते(सामाजिक कार्यकर्ते)
यांनी गावातील लोकांना आव्हान केलेला आहे की अशा आफवांना बळी पडू नये तसेच अशी घृणास्पद कृत्य करणारी व्यक्ती अथवा स्त्री असेल त्यानीही लक्षात घ्यावे अशी कोणत्याही प्रकारची पूजा,विधी,कर्मकांड करून कोणालाही मुलं बाळ किंवा इतर कोणत्याही प्रकारचा धन लाभ अथवा आर्थिक फायदा होत नाही परीणामी स्वतःची इज्जत व जीव टांगणीला टाकून अश्या व्यक्ती गावात भीतीचे वातावरण पसरवीत आहे परिणामी लहान मुले व महिला भगिनी आणि गावकऱ्यां मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे अशा अफवा पसरविणाऱ्यावर व अशी कृत्ये करणाऱ्या कायदेशीर कारवाई करण्यासाठी फर्दापूर पोलीस व अंधश्रद्धा निर्मूलन समिती यांना कळविले असून लवकरच त्यासाठी गोपनीय माध्यमातून माहिती घऊन सदर व्यक्तीबद्दल व कृत्य करणाऱ्या पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येईल यांची काळजी घ्यावी.व अश्या कृत्यांना लककर आळा घालावा म्हणून त्यासाठी आता गावांतील तरुण मित्रमंडळी व गावकरी आता एकवटले आहे अशी माहिती देण्यात आली.

# शिवसैनिक जनार्दन जगदाळे यांनी शेतकऱ्याचे अकरा हजार केले परत

## शिवसैनिकांनी केला सत्कार : प्रामाणिक पणाचे कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**लासूर स्टेशन :** येथून जवळच असलेल्या धोदंलगाव येथील शेतकरी वसंत ढंगारे यांनी लासुर स्टेशन येथे कांदा विकून ट्रकटर मधुन घरी जात असताना लासुरगाव रोड येथे त्यांच्या खिशातुन विक्री केलेल्या मालाचे ११००० रूपये हरवले होते. ते लासुर येथील शिवसैनिक जनार्दन खंडेराव जगदळे यांना सापडले त्यांनी लगेच त्या शेतकऱ्याचा पाठलाग करून त्यांच्या कडील पावती बघून खात्री पटवून घेऊन त्यांना पैसे परत केले.
ह्या शिवसैनिकाच्या प्रामाणिक पणाचे कौतुक सगळी कडे करण्यात आले आज गंगापूर पंचायत समितीचे उपसभापती तथा उपसरपंच संपत छाजेड यांनी सत्कार केला.
यावेळी तालुकाप्रमुख दिनेश मुथा, माजी सभापती संजय जैस्वाल, शहरप्रमुख अमोल शिरसाठ, माजी शहरप्रमुख नितीन पाटील कांजुणे, ग्रामपंचायत सदस्य मयुर जैस्वाल, नारायण ठोळे, भाऊसाहेब गाडेकर ,मोहसीन बागवान, नितीन जाधव अजय साखळे, अरशद मन्सुरी, प्रदीप बोराडे, मनोज सुराशे, विजय भाले, रवि गायकवाड,भूषण रणयेवले, आदेश रणयेवले,आकाश भगुरे,सुदाम निबांळकर, चंदू बनसोडे, महिला आघाडी च्या नंदा पगारे, शोभा बनकर यांच्यासह शिवसैनिकांची उपस्थिती होती.



# चुलताच बनला नराधाम: चिमुकलीवर बलत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**आडूळ :** किराणा दुकानात गोळ्या बिस्कीट आण्यासाठी आलेल्या एका पाच वर्षीय चिमुकलीवर सख्ख्याचुलत चुलत्यांनेच बलात्कार केल्याची अतिशय धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पैठण तालुक्यातील कडेठाण तांडा येथे बुधवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजेच्या सुमारास उघडकीस घडली असून बळीराम सिताराम चव्हाण वय २५ रा.कडेठाण तांडा यांच्या विरूद्ध पाचोड ता.पैठण पोलिस ठाण्यांत गुरुवारी (दि.२२)रोजी बलत्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला असुन पोलिसांनी आरोपीस ताब्यात घेतले आहे. सूत्राच्या माहितीनुसार, पैठण तालुक्यातील कडेठाण तांडा येथे बळीराम सिताराम चव्हाण याची किराणा असल्यामुळे पीडित मुलीचे घर शेजारीच आहे.ती बुधवारी सायंकाळीच्या वेळी दुकानात गोळ्या बिस्कीट आण्यासाठी गेली. त्यावेळी आरोपीने अल्पवयीन मुलीला दुकानाच्या घेऊन तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला.त्यानंतर ती चिमुकली घरी रडत रडत गेली. मात्र,मुलगी का रडत आहे असे आईने विचारलं त्यावेळी ती घाबरली असल्यामुळे तीला काही सांगता येत नव्हते. त्यावेळी चिमुकलीच्या आईने तिला विश्वासत घेऊन विचार पुस केली असता तिने घडलेला प्रकार आईला सांगितले. त्यावेळी मुलीच्या आईवडिलांनी गुरुवारी (दि.२२) लगेच पाचोड पोलिस ठाणे गाठून सात वर्षीय मुलीवर बलात्कार झाल्याची माहीती दिली असता पाचोड पोलिस ठाण्यांचे सहाय्यक पोलिस निरिक्षक उपनिरिक्षक सुरेश माळी,बीट जमादार संतोष चव्हाण यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन आरोपीला ताब्यात घेतले. यावेळी सहाय्यक पोलिस निरिक्षक जनाबाई सांगळे यांच्या पथकास घटनास्थळी येऊन पाहणी केली आहे. या घटनेची नोंद पाचोड पोलिस ठाण्यांत दाखल करण्यात आली आसून पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक जनाबाई सांगळे हे करीत आहे.

# शेकटे बुद्रुक येथील तरुणाचे सिनेस्टाईलने अपहरण

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** तालुक्यातील शेकटे बुद्रुक येथील एका ३० वर्षीय सोनाजी छबुराव बोरुडे या तरुणाचे गुरुवारी आठवडे बाजार करण्यासाठी दुचाकीवरून शेकटे बुद्रुक येथून बोधेगावला येत असताना दि. २२ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास शेवगाव-गेवराई राज्य महामार्गावरील बालमटाकळी येथील मे. साई कोटेक्स अँड जिनिंग फॅक्ट्री जवळ अचानकपणे त्यांची मोटरसायकल थांबवुन त्यांना तीन ते चार इसमांनी बळजबरीने बोरुडे यांना चारचाकी बोलोरो गाडीत टाकले आणि बोलोरो गाडीतील एकाने त्यांची मोटरसायकल घेऊन गेवराईच्या दिशेने घेऊन गेले हा सिनेस्टाईलने



चाललेला सर्व थरार त्यांचा पुतण्या लक्ष्मण भीमराव बोरूडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मोटरसायकलवर त्याच्या पाठोपाठ येत असतानाच पाहिले. याबाबत शेवगाव पोलिसात अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून लक्ष्मण भीमराव बोरुडे यांनी शेवगाव पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, मी लक्ष्मण भीमराव बोरुडे व बाबासाहेब भीमराव बोरुडे आम्ही दोघे बोधेगावचा आठवडी बाजार असल्याने बाजार करण्यासाठी बोधेगाव येथे जात होतो. त्यावेळी आमचे समोर माझे चुलते सोनाजी बोरुडे हे त्यांच्या मोटरसायकल वरून बाजाराकरिता बोधेगाव येथे जात होते आम्ही बालमटाकळी येथील साई कोटेक्स जिनिंग जवळ आलो असता आमचे समोर मोटरसायकल वरून जात असलेले माझे चुलते सोनाजी बोरुडे यांना काही इसमानी थांबवले व बोलेरो गाडीत जबरदस्तीने बसवून त्यांच्याकडील मोटारसायकलसहित ते गेवराईकडे जाणाऱ्या रस्त्याने जात असताना आम्ही पाहिले. आम्ही त्यांना अडविण्याचा प्रयत्न केला. परंतू ते न थांबता तसेच गेवराईकडे निघून गेले. आम्ही त्यांचा पाठलाग केला परंतु ते खूप वेगाने निघून गेल्याने ते आम्हाला दिसे नासे झाले. त्यानंतर आम्ही सदरबाबत त्यांची पत्नी दिक्षा सोनाजी बोरुडे यांना फोनकरून सांगितले. त्यानंतर आमच्या गावातील काही लोक आमच्याजवळ आले आम्ही त्यांना झालेली हकीकत सांगितली त्यानंतर आम्ही माझे चुलते सोनाजी छबुराव बोरुडे यांचा गेवराई रोडने शोध घेतला परंतु ते मिळून आले नाही त्यानंतर माझे चुलते सोनाजी छबुराव बोरुडे यांना ३ ते ४ इसमानी काहीतरी अज्ञात कारणाकरिता जबरदस्तीने बोलेरो गाडीत बसवुन घेऊन जाऊन त्यांचे अपहरण केले असल्याबाबत आमची खत्री झालेली आम्ही शेवगाव पोलीस स्टेशनला फिर्याद दिली आहे. असे शेवगाव पोलीसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

# धुळ्यात गावठी कट्ट्यासह एकाला अटक

## धुळे पोलिसांची कारवाई : पाच जिवंत काडतूस जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरात गुन्ह्याच्या उद्देशाने दिवसा गावठी कट्टा व जिवंत काडतूस घेवून फिरणाऱ्यास शहर पोलिसांनी रंगेहात पकडले. त्यांच्याकडून गावठी कट्ट्यासह पाच जिवंत काडतूस जप्त करण्यात आले.

या प्रकरणी शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळे शहरात आगामी नवरात्र व इतर सणोत्सव लोकांना निर्भयपणे साजरे करता यावे, याकरीता गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तीवर कठोर कारवाई करावी, असे आदेश पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील यांनी दिले आहेत. त्यानुसार पोलिसही लक्ष ठेवून आहेत. सहजिवन नगर शायकीय दुध डेअरी रोड परिसरात एक इसम काही तरी गंभीर अपराध करण्याचे इराद्याने गावठी कट्टा बाळगुन फिरत असल्याची गोपनीय माहिती पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांना मिळाली. त्यांनी शोध पथकातील अंमलदारांना तात्काळ कारवाईचे आदेश दिले. पथकाने शासकीय दुध डेअरी परिसरात सापळा लावला. सकाळी आठ वाजेच्या सुमारास एक इसम संशयास्पद फिरत असल्याचे दिसताच पथकाने त्याला ताब्यात घेतले. रविंद्र ऊर्फ राजु हनुमान वर्मा (वय. 53 रा. सहजिवन नगर, शायकीय दुध डेअरी रोड, धुळे) असे त्याने त्याचे नाव सांगितले. त्यांची अंगझडती घेतली असता त्याच्या कमरेला डाव्या बाजुस एक पिस्टल व पॅन्टच्या उजव्या खिशात पाच जिवंत काडतुस मिळून आले. एकुण 27 हजार 500 रुपये किमंतीचे अनधिकृत शस्त्र जप्त करण्यात आले. याप्रकरणी शहर पोलिसात भारतीय हत्यार कायदा कलम 3/25 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास असई भिकाजी पाटील करीत आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक प्रविणकुमार पाटील, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, उपविभागीय पोलिस अधिकारी ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली धुळे शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नितीन देशमुख तसेच पोसई बी.जी. शेवाळे, शोध पथकाचे पोलीस अंमलदार असई भिकाजी पाटील, पोना कुदंन पटाईत, पोकॉ प्रविण पाटील, मनिष सोनगिरे, तुषार मोरे, अविनाश कराड, गुणवंत पाटील, शाकीर शेख यांच्या पथकाने केले.



# नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** युवासेना नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे सत्कार पूर्व विधानसभा संघटक राजू भाऊ वैद्य यांनी केला. युवासैनिकांनी पक्षाचे काम जोशात करावे. काहीही मदत लागली तर आम्ही करू परंतु निष्ठेने पक्षाचे कार्य पुढे घेऊन जात राहा असे मार्गदर्शन राजूभाऊ वैद्य यांनी पदाधीकारी यांना केले यावेळी युवासेना उपजिल्हाधिकारी प्रकाश धुर्वे, शहारधिकारी स्वप्नील डिडोरे, शहर समनव्यक विशाल सानप, शहर चिटणीस मनोज क्षीरसागर, उपशहर चिटणीस साईनाथ थोरवे, उपशहर अधिकारी सागर राऊत, शुभम साळवे,आकाश पोळ,समाधान बनकर,नितेश थट्टेकर यांना शुभेच्छा दिल्या यावेळी अल्पसंख्याक संघटक अखिल शेख, शाखाप्रमुख राम केकान, वाळुंज बाळासाहेब, राज नीळ, कमलेश कोकणे आदी उपस्थित होते.



# अंबाडी मध्यम प्रकल्पाचे शंभर टक्के भरले: रेल येथील शेतकऱ्यांनी केले जलपूजन

आधुनिक केसरी न्यूज



**कन्नड :** शहरातील नागरीकांची तहान भागवणारा अंबाडी प्रकल्प 100 टक्के भरला असुन हा प्रकल्प ओसंडुन वाहु लागला आहे. प्रकल्प ओसंडुन वाहणारे दृष बघण्यासाठी शहरातील नागरीकांची गर्दी होत आहे.

रेल शिवारातील शेतकरी व अंबाडी मध्यम प्रकल्पावरील अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत जल पूजन करण्यात आले जल पूजन करताना शाखा अभियंता जारवाल साहेब कालवा निरीक्षक वाघ साहेब कालवा चौकीदार भोकरे साहेब, राठोड साहेब, देवरे साहेब तसेच रेल येथील शेतकरी व भैरवनाथ मंदिराचे अध्यक्ष सोपान बोडखे, सचिव संतोष थेटे, सहसचिव वाल्मीक थेटे, ह भ प बाळू महाराज वाकळे, प्रगतशील शेतकरी योगेश थेट उपस्थित होते. अंबाडी प्रकल्पाच्या दोन्ही कालव्यातून अंधानेर, रेल, मक्रणपुर, कन्नड, विठ्ठल पूर, डोणगाव, शिवराई, बहिरगाव या शिवारातील शेतकऱ्यांचा सिंचनाचा व पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटला असून अंबाडी प्रकल्प भरल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे .

# रिस्पेक्ट फाउंडेशन ऑफ वेडिंग फोटोग्राफर्स महाराष्ट्र अभियान अंतर्गत एक हात मदतीचा कार्यशाळा

आधुनिक केसरी न्यूज



**अंबाजोगाई :** रिस्पेक्ट फाउंडेशन ऑफ वेडिंग फोटोग्राफर्स महाराष्ट्र अभियान अंतर्गत एक हात मदतीचा रिस्पेक्ट उभारी कार्यशाळा आज बीड येथे संपन्न झाली.

फोटोग्राफर गोविंद नखाते रा. आवरगाव ता. धारूर जि. बीड यांना वैद्यकीय मदत निधी साठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेच्या माध्यमातून मदतीसाठी फोटोग्राफर्स यांना अभियानामार्फत आवाहन करण्यात आले होते. त्याला संपूर्ण महाराष्ट्रातुन उस्फुर्त प्रतिसाद मिळाला. यात महाराष्ट्रातील फोटोग्राफर्स आणि समाजातील लोकांनी मदतीचा हात पुढे करत 2 लाख 21 हजाररुपयांचा रिस्पेक्टफुल मदतनिधी वैद्यकीय खर्चासाठी उभा करून दिला. त्याबद्दल मी अभियानातर्फे आपणा सर्वांचे मनापासुन आभार मानतो.

सादर कार्यशाळेस 350 हुन अधिक फोटोग्राफर्स यांनी ज्ञानदानाच्या कार्यशाळेत सहभाग घेऊन नखाते सरांसाठी रिस्पेक्टफुल मदत निधी उभा केला.

कार्यशाळेत महाराष्ट्रातून उपस्थित सर्व मान्यवरांचे, फोटोग्राफर्स यांचे आभार मानले. कार्यशाळेत पुण्यातील मेंटॉर श्री. सचिन भोर आणि नागपूर येथील मेंटॉर श्री. के. गणेश यांनी मार्गदर्शन केले. तसेच बीडमधील मेंटॉर श्री आनंद वाघ आणि सोलापूरचे मेंटॉर आनंद मादास यांनीही उपस्थित फोटोग्राफर्स यांना मार्गदर्शन केले. दौंड येथील स्नेह फोटोग्राफर संस्थेच्या सदस्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहिल्या बद्दल त्यांचेही मनापासून आभार मानले. स्नेह फोटोग्राफर संस्थेतील सदस्य ललित गायकवाड यांनी आर्थिक नियोजन, पॉलिसी, इन्शुरन्स बद्दल माहिती दिली. सदर कार्यशाळेस कार्यालय, स्क्रीन, साउंड, जेवण स्पॉन्सर करणाऱ्याही सर्वांचे अभियानातर्फे आभार मानले. कार्यशाळेचे आयोजन आणि नियोजन करण्यात सिंहाचा वाटा उचलणा-या बीड जिल्हा कोअर टीम मराठवाडा विभागातील सर्व फोटोग्राफर्स यांचे कार्य खरच कौतुकास्पद आहे.

# महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिर



आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** शहरातील रायगड नगर याठिकाणी जिल्हा एड्स नियंत्रण कक्ष बीड आणि स्वा. रा.ती.वै.ग्रामीण रुग्णालय अंबाजोगाई आणि ग्रामीण विकास मंडळ TI NGO याचं वतीने ICTC मार्फत एच.आय व्ही तपासणी, शुगर, बीपी, सी.बी.सी. तपासणी शिबीर घेण्यात आले. त्यामध्ये आय.सी.टी.सी. चे समुपदेशक धनराज पवार सर यांनी जनरल महिला व पुरुष आणि FSW अँड MSM KP ना एच.आय.व्ही. होण्याची मुख्य चार कारणे सांगून टी.बी. होण्याचीही लक्षणे सांगण्यात आली. नंतर जनरल महिला व पुरुष आणि FSW अँड MSM KP ना गुप्त रोगाची लक्षणे व STI विषयी मार्गदर्शन करण्यात आले. त्यानंतर प्रयोगशाळा तंत्रज्ञ विश्वास लवंद यांनी जनरल महिला व पुरुष आणि FSW अँड MSM KP ची एच.आय.व्ही तपासणी करण्यात आली व तसेच माने सर व त्यांची टीम यांनी CBC , BP, शुगर तपासणी करण्यात आली. कॅम्प यशस्वी होण्यासाठी FSW 1200 टि.आय. चे समुपदेशक भिमा कांबळे, ORW घाटे रेखा मॅडम, किष्किंदा पांचाळ मॅडम व पिअर प्रेमा बचुटे शांताताई राठोड यांनी सहकार्य केले.

# वाढदिवसानिमित्त माजी आमदार नितिन पाटील यांचा नागरी सत्कार



आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील शिक्षक पतसंस्थेच्या सभागृहात जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त नागरी सत्काराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थितांनी कन्नड विधानसभेचे प्रतिनिधित्व करण्याचे आवाहन केले. हाच धागा पकडून सत्काराला उत्तर देताना पाटील म्हणाले की, राज्यात औरंगाबाद जिल्हा बँकच फायद्यात आहे. ठेवीदार आणि संचालक यांच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही. वीस वर्षांपूर्वी अनुभव नसताना तालुक्याने आमदार केले.आता मला सर्व अनुभव आला आहे. विधानसभेत संधी मिळाल्यास तालुक्याचा सर्वांगिण विकास नक्कीच साधेल. शिवसेना फुटली आणि विद्यमान आमदार उद्धवजी ठाकरे यांच्या पक्षात थांबल्याने माझी लॉटरी लागणार आहे. म्हणून मी शिंदे गटात गेलो, असे म्हणताच उपस्थितांत हशा पिकला. यावेळी नितिन पाटील यांचे वडील स्व. सुरेशदादा पाटील यांच्या आठवणीने भाऊकही झाले. प्रास्ताविक मेहगावचे सरपंच पांडुरंग घुगे यांनी केले. यावेळी बँकेचे संचालक डॉ. मनोज राठोड, कौतिकराव पवार ॲड. कृष्णा जाधव, राजू चौहान, माजी उपनगराध्यक्ष वाल्मीक लोखंडे, डॉ. सिकंदर कुरेशी, खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष सुरेश डोळस, साहेबराव अकोलकर, धनराज बेडवाल, अण्णामंत्री पवार, आबासाहेब पवार, सुभाष महाजन आदींची भाषणे झाली.मंचावर रामभाऊ ससे, अविनाश काळे, भगवान गिते, कारभारी सोनवणे, ज्ञानेश्वर पवार, बाळासाहेब जाधव, नंदुशेठ, विश्वास सोनवणे, साबुसिंग राठोड आदींची उपस्थिती होती. या प्रसंगी प्रकाश गर्जे, संदीप नरोडे, आदित्य गरजेआनंद लोखंडे प्रकाश बारगळ, रमेश पाटील, विजय सोनवणे, सचिन मोरे, नितीन सुचलादे, आदिंसह मोठ्या संख्येने तालुक्यातील सरपंच सोसायटी चेअरमन उपस्थित होते. सुत्रसंचालन डॉ. मनोज राठोड यांनी केले .

# भोकरला डंपींगग्राऊंडचे साहित्य अडगळीत

## पालीकेच्या दूर्लक्षाने नागरीकांचे आरोग्य धोक्यात

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** शहरातील घाण केरकचरा नष्ट करण्यासाठी स्वतंत्र डंपींग ग्राऊंडची जागा निश्चित करण्यात आली आहे.मागील अनेक दिवसांपासून त्याचा वापर होत नसल्याने कचरा चक्क उघड्यावर टाकला जातो आहे. परिणामी नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.नगरपालीका याबाबत ठोस निर्णय घेत नसल्याने आलेले साहित्य पालीकेच्या प्रांगणात धुळखात पडून आहे.यावर त्वरीत तोडगा काढुनी नागरीकांची होणारी हेळसांड दूर करावी अशी मागणी जोर धरू लागली आहे.

#शहरात प्रारंभी ग्रामपंचायत अस्तित्वात होती त्यामुळे विकास कामांना फारसी गती मिळाली नाही.वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन नगर पालिका करण्यात आली आहे.त्यामूळे भरघोस निधी मिळाल्याने हळूहळू लोकाभिमुख कामांना गती मिळाली.मागील दोन वर्षांपासून पालीकेवर प्रशासक नियुक्ती करण्यात आल्याने पुन्हा कामाला ब्रेक लागला आहे.नागरीकात पालीकेच्या कामावर तीव्र नाराजी आहे.येथील विकास कामात यापूर्वी कोट्यावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याने अनेकांना जेलची हवा खावी लागली. माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांचा मतदारसंघ असल्याने त्यांनी संबंधीतांना दम देऊन कामात पारदर्शकता असावी असा कानमंत्र दिला तरी फारशी सूधारणा झाली नाही.सध्या प्रशासक असल्याने अधिकारी नाममात्र कामे करून मोकळे होत आहेत.याचा फटका सर्व सामान्य नागरिकांना बसतो आहे.पालीकेतील अधिकारी सतत शासकीय बैठकीचे कारण समोर करून गैरहजर असतात त्यामुळे कर्मचाऱ्यांवर कूणाचेच अंकुश नाही. मर्जीतल्या कर्मचाऱ्यांना हाताशी उरले सूरले कामे सावरून घेतले जात आहेत.पालीकेच्या ढेपाळलेल्या कारभारात त्वरीत सुधारणा करणे गरजेच आहे अशी नागरिकांची मागणी आहे. शहरातील डंपींग ग्राऊंडची जागा निश्चित केली असली तरी त्याचा आजपर्यंत वापर करण्यात आला नाही.दूर्गंधीयुक्त ओला व सुका कचरा उघड्यावर टाकला जातो अशी नागरिकांची तक्रार आहे.पालीकेतील अधिकारी मात्र फारसे लक्ष देत नसल्याने कचरा नागरी वसाहती लगत उघड्यावर टाकला जातो आहे. मागील चार-पाच दिवसापूर्वी प्रशासक अधिकारी तथा तहसीलदार राजेश लांडगे व मुख्याधिकारी प्रियांका टोंगे यांनी नाममात्र डंपीग ग्राउंडच्या जागेची पाहणी करून रिकाम्या हाताने परत आले आहेत.कचरा नष्ट करण्यासाठी आलेले साहित्य पालीकेच्या प्रांगणात अनेक दिवसांपासून धुळखात पडून आहे.त्याचा वापर कधी होणार हे मात्र अद्याप स्पष्ट होऊ शकले नाही.



## अनुसयाबाई नागे यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** तालुक्यातील सराई रहिवासी गं. भा. अनुसयाबाई आसाराम नागे वय १०६ यांचे वृद्धाकाळाने दि.२३ शुक्रवार रोजी दुपारी साडेबारा वाजता दुखःद निधन झाले. त्याच्या पार्थिवावर सायंकाळी सराई येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. आहेत. त्या खुलताबाद पंचायत समितीचे माजी उपसभापती कै. आसाराम लक्ष्मण नागे यांच्या पत्नी होत्या, त्याचे पश्चात तीन मुले, तीन मुली, नातवंडे असा परिवार असुन माजी ग्रां.पं. सदस्य सुरेश नागे व सेवानिवृत्त मुख्याध्यापक नारायण नागे गुरूजी यांच्या त्या मातोश्री होत्या.



## कु. शर्वरी अकोलकरला रौप्य पदक

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** महाराष्ट्र पिंच्याक सिलेट असोसिएशन यांनी नाशिक येथे १२ व्या इंटरनॅशनल स्कूल या शाळेतून पिंच्याक सिलेट या क्रीडा प्रकारासाठी कु. शर्वरी अकोलकर या विद्यार्थिनीची चाचणी घेऊन निवड करण्यात आली. दोन सामन्यापैकी पहिल्या सामन्यामध्ये कु. शर्वरी राहुल अकोलकर विजयी झाली. स्पर्धेच्या अंतिम व अटी-तटीच्या या लढतीत मुंबई संघाविरुद्ध पराभव स्वीकारून रौप्य पदकावर समाधान मानावे लागले. यासाठी प्रशिक्षक. योगेश जाधव कृष्णा चव्हाण यांचे बहुमूल्य मार्गदर्शन लाभले. तसेच या यशाबद्दल सर्व विजेत्या खेळाडूंचे महाराष्ट्र पिंच्याक सिलेट असोसिएशनच्या अध्यक्ष, देशमुख इंटरनॅशनल स्कूलच्या सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले.

# उद्धव ठाकरे यांचा सामना करण्यासाठी भारतीय जनता पार्टीचा बूथ प्रमुखच सक्षम : चंद्रशेखर बावनकुळे

आधुनिक केसरी न्यूज

**कचनेर :** औरंगाबाद शहरातील संत एकनाथ रंगमंदिर येथे भारतीय जनता पार्टीचा केंद्रप्रमुख व सर्व पदाधिकाऱ्यांचा मेळावा नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे याच्या उपस्थितीमध्ये मेळावा पार पडला. यावेळी भारतीय जनता पार्टीच्या शक्ति केंद्रप्रमुखांना त्यांनी मोलाचं मार्गदर्शन केले. यावेळी बोलतानी त्यांनी उद्धव ठाकरे यांनी त्यांच्यावर केलेल्या टीकेला उत्तर दिले. उद्धव ठाकरे यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांना उद्देशून म्हणाले होते की बावनकुळे येऊन द्या 156 कुळे येऊन द्या शिवसेना सक्षम आहे त्यांचा सामना करण्यासाठी. अशी टीका केली होती. या टीकेला उत्तर देतानी बावनकुळे म्हणाले की मला सामना करण्याची गरजच नाही भारतीय जनता पार्टीचा बूथ




प्रमुख आपला सामना करण्यासाठी सक्षम आहे. यावेळी त्यांनी भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्याला येणाऱ्या महानगरपालिका. जिल्हा परिषद. नगरपालिका. पंचायत समिती तसेच लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी कामाला लागा असे आव्हान केले. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे यांचा भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष विजय औताडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या मेळाव्यासाठी महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल जी सावे. माजी विधानसभा अध्यक्ष हरिभाऊ नाना बागडे, विजयाताई रहाटकर, नवनिर्वाचित प्रदेश सरचिटणीस संजय भाऊ केनेकर, असे मातब्बर नेते उपस्थित होते. या मेळाव्याला भारतीय जनता पार्टीचे सर्व पदाधिकारी, शक्ती केंद्रप्रमुख, सर्व आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते. त्याचप्रमाणे किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष कल्याण नाना गायकवाड, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सुरज लोळगे. तुषार भाऊ सिसोदे. लक्ष्मण औटे. चंद्रकांत हूड. दत्ता बांडे. गजानन बोहरा व पैठणचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

# लासूरला जोडे मारो आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** तालुक्यातील लासूर स्टेशन शिवसेना शहर शाखेच्या वतीने रामदास कदम ने शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व ठाकरे परिवारावर केलेल्या वायफळ आणि अर्वाच्य वक्तव्याच्या निषेधार्थ रामदास कदम यांच्या फोटोला येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात जोडे मारून आंदोलन करण्यात आलेण्

यावेळी तालुका प्रमुख दिनेश मुथा.पंचायत समिती माजी सभापती तथा उपसरपंच संपत छाजेड, माजी सभापती संजय जैस्वाल, शिवसेना शहर प्रमुख ग्रामपंचायत सदस्य अमोल शिरसाठ, ग्रामपंचायत सदस्य नारायण ठोळे, माजी शहरंप्रमुख नितीन कांजुने, अरशद मन्सूरी जेष्ठ शिवसैनिक भाऊसाहेब गाडेकर युवासेना जिल्हा समन्वयक ग्रामपंचायत सदस्य मयूर जैस्वाल,माजी ग्रामपंचायत सदस्य मनोज सोनवणे, मोहसीन बागवान, उपशहर प्रमुख नितीन जाधव, युवासेना शहरअधिकारी योगेश मापारी, शाखा प्रमुख अमोल काकडे, विजय भाले, रवी गायकवाड, प्रदीप बोराडे, मनोज सुराशे, भूषण रणयेवले, आकाश पवार, चंद्रकांत बनसोडे,सिद्धार्थ नरवडे, राज धने, महिला आघाडी उपविभाग प्रमुख नंदा पगारे, उपशहर प्रमुख शोभा बनकर सह शिवसैनिक युवासैनिक उपस्थित होते.



## कठड्यावर आदळून दुचाकीस्वाराचा मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** नळस्टॉप चौकातील उड्डाणपुलाच्या कठड्यावर आदळून दुचाकीस्वार तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास घडली. संगमेश्वर सिद्धराम साखरे (वय २८, रा. सोलापूर) असे मृत्युमुखी पडलेल्या तरुणाचे नाव आहे. दुचाकीस्वार साखरे हे नळस्टॉप चौकातील अटलबिहारी वाजपेयी उड्डाणपुलावरुन पौडफाटा चौकाकडे जात होता.

# महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात इंग्लिश भाषा वाङमय मंडळाची स्थापना



आधुनिक केसरी न्यूज

**पिशोर :** येथील महात्मा ज्योतिबा फुले कनिष्ठ महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय सांकेतिक भाषा दिनाच्या पार्श्वभूमीवर इंग्लिश भाषा वाङमय मंडळाची स्थापना करण्यात आली. कृती आधारित शिक्षण देणे आणि घेणे हा या मंडळाचा उद्देश आहे. श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन हे चार कौशल्य वृद्धिंगत करण्यासाठी या मंडळांने काम करावे असे प्रतिपादन घाटमाथा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष क. रा. नवले गुरुजी यांनी या वेळेस केले.

मंडळाची कार्यकारिणी पुढीलप्रमाणेः कावेरी नागरे (अध्यक्ष), ऋतुजा थोरात (सचिव), अभय शिंदे (उपाध्यक्ष), पायल भालेराव (उपाध्यक्ष), रंगनाथ मोकासे (सहसचिव), अभिषेक राठोड (सहसचिव), रोजिया शेख (समन्वयक), सदस्यः शुभांगी बनकर, रोहन चौधरी, वैष्णवी पवार, भारती जाधव, साक्षी भोसले, किशोर मुरारे, शुभांगी निकम, पूजा डिघोळे, भारती पंडित, मोनिका खरात, मधुराणी ढेपले, विद्या सोनवणे, वैष्णवी मार्गमे, पलक ठोळे. इंग्लिश विभागाच्या वतीने भाषा वांग्मय मंडळाच्या स्थापनेत डॉ. संजय गायकवाड यांनी पुढाकार घेतला.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य निवृत्ती नवले, विभाग प्रमुख प्रा. विजय वाघ, प्रा. राजेश भावसार, प्रा. विजय पाटील, प्रा. प्रशांत कोतकर, प्रा. विजय सोनवणे, प्रा. संतोष जाधव, प्रा. सत्येंद्र सपकाळे, प्रा. जयवंतराव पाटील, डॉ. गीताराम पवार, प्रा. शहादेव गावडे, प्रा. मनोज मोकासे, प्रा. अमोल निकम, लक्ष्मण मोकासे, समाधान मोकासे, यासीन शहा यांची उपस्थिती होती.

इंग्लिश भाषा वाङमय मंडळाच्या माध्यमातून इंग्रजीचे मूलभूत कौशल्य प्राप्त करण्याचा आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू असा विश्वास यावेळी मंडळातील सदस्यांनी व्यक्त केला.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in